१९६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १९२५
१९८६
REFBK-0013483
REFBK-0013483



## स्वामी विवेकानंद

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

स्वामी वि : हे साधारणतः आदर्श संत, आदर्श देशभक्त आणि मानवजातीचे आदर्श सेवक म्हणून लोकांना ठाऊक आहेत. ते उच्च कोटीचे आणि दैवी प्रतिभेचे कविदेखील होते ही गोष्ट सर्वांना माहीत नाही. कधी कधी आपल्याला दिसून येतें की संतांची आध्यात्मिक शक्ति काव्याच्या किंवा कलेच्या रूपांत प्रकट होते. स्वामी विवेकानंदांनी सुद्धा अनेक कविता, गीतें व स्तोत्रें रचलीं आहेत, आणि त्यांतून आपल्याला त्यांच्या अलौकिक प्रतिभेची कल्पना येते. आत्मसाक्षात्कारांतून उद्भवलेली दिव्य स्फूर्ति हीच त्यांच्या काव्याचें अधिष्ठान असल्यामुळे तें वाचतांना वाचकांना सुद्धा त्या सर्वोच्च अनुभवाची, पुसट का होईना पण प्रतीति येते. त्यांच्या काव्यांत मानवतेबरोबर दिव्यत्वाचाहि साक्षात्कार घडत असल्यामुळे तें वाचकांच्या हृदयाची तात्काळ पकड घेते.

१९६३
१९४५
~~८५२३८~~
७/८१
८५२०८
१७/३/८१
मराठी ग्रंथ संग्रहालय

# क वि ता

## स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक
अनुक्रम ७५२०७ वि: काव्य
क्रमांक १८८६ नों दि: १७।३।७१

अनुवादक :
कविभूषण प्रा. ब. ग. खापर्डे

ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३४८३
स. क.
REFBK-0013483
REFBK-0013483

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

प्रकाशक—
स्वामी भास्करेश्वरानंद,
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ४३ वें

( श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्व अधिकार सुरक्षित )

मूल्य रु. १.५०

मुद्रक—
श्री. डी. पी. देशमुख,
बजरंग मुद्रणालय,
कर्नलबाग, नागपूर-२.

# दोन शब्द

'कविता' हा स्वामी विवेकानंदांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करतांना आम्हांला आनंद होत आहे. स्वामी विवेकानंद हे साधारणत: आदर्श संत, आदर्श देशभक्त आणि मानवजातीचे आदर्श सेवक म्हणून लोकांना ठाऊक आहेत. ते उच्च कोटीचे आणि दैवी प्रतिभेचे कविदेखील होते ही गोष्ट सर्वसामान्य जनतेला माहीत नाही. कधी कधी आपल्याला दिसून येतें की संतांची आध्यात्मिक शक्ति काव्याच्या किंवा कलेच्या रूपांत प्रकट होते. आद्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर, कबीर, तुलसीदास, मीराबाई इत्यादि संतांचे भव्योदात्त आध्यात्मिक अनुभव काव्यांतून वा गीतांतून प्रकट झालेले दिसतात. स्वामी विवेकानंदांनी सुद्धा अनेक कविता, गीतें व स्तोत्रें रचलीं आहेत, आणि त्यांतून आपल्याला त्यांच्या उच्च आध्यात्मिक अनुभवांचें व अलौकिक प्रतिभेचें दर्शन घडतें. स्वामी विवेकानंदांनी 'प्रलय अथवा गाढ समाधि', 'सृष्टि', 'कालि करो मग नृत्य तिथे!' इत्यादींसारख्या कविता दिव्य स्फूर्तीच्या अवस्थेंत लिहिल्या आहेत आणि या कवितांवरून त्यांच्या आध्यात्मिक अनुभूतींची सखोलता व प्रगाढता आपल्या प्रत्ययास येते. त्यांच्या काव्याला परतत्त्वाचा, आत्मानुभूतीचा स्पर्श झालेला असल्यामुळे तें वाचतांना वाचकांना सुद्धा त्या सर्वोच्च अनुभवाची, पुसट का होईना पण प्रतीति येते. त्यांच्या काव्यांत

मानवतेबरोबर दिव्यत्वाचाहि साक्षात्कार' घडत असल्यामुळें तें वाचकांच्या हृदयाची तात्काळ पकड घेते.

वाचकांच्या सोयीसाठी आम्हीं त्यांच्या काव्याचे चार विभाग केले आहेत. स्वामी विवेकानंदांनी इंग्रजी, बंगाली, संस्कृत व हिंदी या भाषांमधे काव्यरचना केली आहे. म्हणून प्रस्तुत पुस्तकाचे चार विभाग केले असून त्यांत या चार भाषांतील कवितांचा, गीतांचा व स्तोत्रांचा अनुवाद समाविष्ट केला आहे.

कविभूषण प्रा. बळवंत गणेश खापर्डे यांनी स्वामी विवेकानंदांच्या मूळ इंग्रजी, बंगाली, संस्कृत व हिंदी काव्याचा अनुवाद केला आहे. या अनुवादावरून त्यांचें या चार्‍ही भाषां-वरील प्रभुत्व वाचकांच्या निदर्शनास येईल. मूळ काव्यांतील भाव कायम ठेवून त्यांनी रोचक व हृद्य भाषेंत प्रस्तुत अनुवाद केलेला आहे. त्यांच्या या अत्यंत महत्त्वपूर्ण कार्याबद्दल आम्ही त्यांचे अंत:करणपूर्वक आभार मानतों.

प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या वाचनाने सर्वांना दिव्य जीवनाचा साक्षात्कार घडो हीच प्रभुचरणीं प्रार्थना आहे.

दि. १ सप्टेंबर १९६३ — प्रकाशक

# अनुक्रमणिका

## विभाग पहिला (मूळ इंग्रजी)


संन्याशाचें गीत ... ... ... ३

काली माता ... ... ... ७

अजाणतां आलेले देवदूत ... ... ९

जिता जागता देव ... ... ... १३

हे धन्य स्वप्ना ! ... ... ... १४

प्रकाश ... ... ... ... १५

वेळे-आधी उगवलेल्या पुष्पास ... ... १६

शान्तींत विश्रान्ति मिळो तुला रे ! ... ... १७

इथे खेळ माझा असे संपला ! ... ... १८

मौजेचा पत्रव्यवहार ... ... ... २१

'प्रबुद्ध भारता'स ... ... ... ३०

पेला ... ... ... ... ३४

चार जुलैला उद्देशून ... ... ... ३६

जगन्मातेचा खेळ ... ... ... ३९

शूर हृदया ! धीर धर ! ... ... ४१

आशीर्वाद ... ... ... ४३

नाही बोल कुणासही ... ... ... ४४

स्वतःच्या जीवास ... ... ... ४६

शान्ति ... ... ... ... ४७

निर्वाणषट्क ... ... ... ४९

सृष्टयुत्पत्तीचें स्तोत्र ... ... ... ५१


## विभाग दुसरा (मूळ बंगाली)


मित्राप्रत... ... ... ... ५५

तुला ऐकवायासि मी गीत गातों ... ... ५८

कालि करो मग नृत्य तिथे ! ... ... ६६

प्रलय अथवा गाढ समाधि ... ... ७०

सृष्टि ... ... ... ... ७१

समुद्रावर असतां ... ... ... ७२

शिव-संगीत—१ ... ... ... ७४

शिव-संगीत—२ ... ... ... ७५

श्रीरामकृष्ण-आरात्रिक... ... ... ७६


## विभाग तिसरा (मूळ संस्कृत)


श्रीरामकृष्णस्तोत्राणि ... ... ... ८१

श्रीरामकृष्णप्रणामः ... ... ... ८५

श्रीशिवस्तोत्रम् ... ... ... ८६
अंबास्तोत्रम् ... ... ... ८८

**विभाग चवथा** (मूळ हिंदी)

श्रीकृष्ण-संगीत ... ... ... ९३

---

# विभाग पहिला

## (मूळ इंग्रजी)



93483

# संन्याशाचें गीत

(वृत्त--भाटांचें मोठें 'कवीत')

गर्ज रव तो अरे !--गीत जें जन्मलें दूर,--पोंचे न हें पाप जेथे--।
ह्या जगाचें; गुहा पर्वताच्या तशीं दाटही काननें घोर जेथें ।।
शान्ति गहिरी जिथे श्वसनमात्रेंहि ना भंगिण्याची कधी छाति झाली--।
काम-लोभांसि वा कीर्तिच्या लालसे; वाहिनी वाहती जेथ झाली--।।
ज्ञान-सत्यात्मिका आणि त्या शांतिची ह्यांचिया मागुती जन्म घे जी ।
उच्च रव गर्ज रे ! धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।१।।

बंधनें तोड रे, बांधितीं जीं तुला,--कनक जें चमकतें, धातु किंवा--।
हीन काळ्या अशा; प्रेम-द्वेषादि, हें चांगलें-"वांगलें", द्वैत जें वा--।।
सर्व जगतांतलें; जाण रे दास तो दास त्या ताडिलें लाडिलें वा--।
मुक्त नाहीच तो; बंधनें जाहलीं कनकमय हीं तरी बंधकत्वा--।।
कांहि कमती न तीं; सोड--तर सोड तीं ! धीट संन्यासिया ! धैर्य घेई।
उच्च रव गर्ज रे ! वीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।२।।

जाउं दे तम आता; भ्रम तुला जो सदा विभ्रत तेजें अगा ! पुढति नेतो--।
घन तमीं घन तमा अधिक भरतो परी अधिक जैसा जसा पुढति जातो ।।
जीवितासाठि रे घोर तृष्णाच ही ! विझवि रे पूर्ण ही एकदाची ।
जीव जन्मांतुनी मृत्युला, मृतजना तेवि जन्माकडे, हीच खेची ।।
आत्मजय जो करी सर्व तो जिंकितो ! जाण संन्यासिया ! गोष्ट बा ही ।
शरण जाऊं नको ! धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।३।।

---

इ. स. १८९५ च्या जुलै महिन्यांत न्यू यॉर्क संस्थानांतील 'सहस्र-द्वीपोद्यान' (Thousand Island Park) येथे रचलेल्या 'The Song of The Sannyasin' नामक कवितेचा अनुवाद

"पेरि जो, फळहि त्या भाग घेणें पडे," लोक हे बोलती, "कारणानें—।
कार्य येणार हें निश्चयें; चांगलें चांगल्या, दुष्ट दुःखाकडे ने ।।
नियम कोणासिही सृष्टिचा नच चुके; देहधारी परी जाहला जो।
शृंखला बंधना निश्चयें पावतो;" सत्य तों खास हें; परि अहो तो—।।
शुद्ध आत्मा सदा नामरूपाहुनी पलिकडे, अनुभवी नित्य मुक्ति।
"तत्त्वमसि"* जाण रे, धीर संन्यासि !"
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।४।।

सत्य नच जाणतो, फोल स्वप्नीं अशा रंगले जे—पिता आणि माता।
बालकें, पत्निही, मित्रही, ह्यांमधे गुंगुनी व्यर्थ ते बद्ध होतां ।।
स्त्री-पुमान् नाहि आत्मा असा ! तो पिता पुत्र किंवा असे रे कुणाचा ? ।
मित्र किंवा कुणा ? शत्रु किंवा कुणा ? एकतारूप जो नित्य साचा ।।
असत आत्माचि हा सर्व सर्वस्वही; त्याविणें अन्य कोणीच नाही।
आणि तूं तोचि रे; धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।५।।

एक केवल असे, मुक्त तो, जाणता, नामरूपाविणें शुद्ध आत्मा।
पाहुं जातां तया आत्मयालागि रे, दोषही कोणता नाहि किंवा ।।
त्यांत माया असे ! येवढें सर्वही स्वप्न जी पाहते विश्वरूपी।
साक्षि तो ! व्यक्त हो ह्या निसर्गामधे, तेवि तो व्यक्त हो सर्व जीवीं ।।
"तत्त्वमसि" जाण रे, धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।६।।

तूं कुठे शोधिसी ? नाहि कधि मित्र रे, मुक्तता लब्ध हो मर्त्य लोकीं।
अन्य लोकांतही, ग्रंथि की मंदिरीं शोध तूझा असे व्यर्थ हा की ।।
दोरि करिं ती तुझ्या मात्र आहे तुला खेचते जी; अता शोक टाकी।
सोड रे मूठ ती ! धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।७।।

---

* छांदोग्य उपनिषद् अध्याय ६, खंड ८.

"शान्ति सर्वांप्रती प्राप्त होवो !" म्हणे; "जीवमात्रा नसो भीति कोणा–।
मुळिहि माझ्यामुळे; उच्च पर्दि नांदती, भूमिवरि खुरडती त्यांत किंवा–॥
मीच आत्मा असे सर्व भूतांमधे; त्यागि मी जीवना इह परत्र––।
सर्व सर्वत्र मी; स्वर्गही सोडिले, भूमिही सोडिल्या, नर्कमात्र––॥
तेहि मीं सोडिले;––सर्व आशा तशी सर्व भीतीहि मी पूर्ण सोडी।"
तोडि पाशां असें; धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ॥८॥

लक्ष देऊं नको केवि काया जगे ह्यापुढे, वा तुला त्यजुनि जाई।
कार्य झालें तिचें; ती सुखें वाहुं दे कर्म आता तिला जेथ नेई॥
पुष्पमाळा कुणा घालुं दे तव गळां, लाथही मारुं वा अन्य कोणी––।
मर्त्य देहास ह्या; कांहि बोलूं नको; काय निंदा-स्तुती तेथ राही––॥
स्तुत्य-स्तोता जिथे, निंद्य-निंदक जिथे उभयही मिसळुनी एक होई।
शांत हो ह्यापरी; धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ॥९॥

सत्य नच ये कधी काम जेथे असे, कीर्तिची लालसा, लोभ लाभा––।
धडपडे वा जिथे; पूर्ण नच हो कधी जो कुणी मानितो स्त्रीसि किंवा–॥
पत्नि रे आपुली; ठेवितो स्वामिता जो कुण्या अल्पही वस्तु ठायीं।
बद्ध क्रोधें असे; लंघुनी द्वार ते कधि न मायापुरी सोडितातो॥
हे तरी त्यागि रे; धीट संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ॥१०॥

होइ "अनिकेत"* तूं; कोणतें गेह तें जें धरी रे तुला सांग बंधो ?।
गगन आढें तुझें, गवत शय्या तुझी, अन्न तव जें जसें सहज लाभो॥
पाक हा चांगला, नाहि वा चांगला, कांहिही जोखुनी मुळि न पाही।
अन्न वा पेय वा कोणतेंही कधी थोर आत्म्या न त्या दूषवीही॥
जाणतो तो स्वतालागि; स्वच्छंद वाहे नदी खळखळा मुक्त जेवी।
तेवि स्वच्छंद हो; धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ॥११॥

* गीता १२, १९.

सत्य जे जाणती फार थोडे असे; द्वेष करितील रे अन्य सारे ।
आणि हसतील रे, थोर जीवा ! तुला; लक्ष देऊं नको मुळिच बा रे ।।
मोकळा होउनी संचरे मेदिनी; जागजागीं जना साह्य करि रे--।
अंधकारांतुनी यावया बाहिरीं सारुनी दूर माया-पटातें ।।
भीति नच रे धरीं यातनांची उरीं, सुख न शोधावया कधिहि जाई ।
द्वैत हें लंघुनी धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।१२।।

क्रम असा हा तुझा चालुं दे रोजचा जोंवरी थकुनिया कर्मशक्ति--।
संपुनी सोडुनी मुक्त जीवा करी; त्यापुढे मग तुला नित्यमुक्ति ।।
जन्म नाही पुन्हा, 'मी'-हि नाही पुन्हा, 'तूं'-हि नाही पुन्हा, देवहीं ना ।
मनुजजातीहि ना त्यापुढे; जाहला सर्व आत्माचि हें विश्व जाणा ।।
विश्वही जाहलें आत्मरूपीच हें, आणि शांती तिथे नित्य राही ।
"तत्त्वमसि" जाण रे, धीर संन्यासि !
"ॐ तत्सत् ॐ तत्सत् ॐ" गीत गाई ।।१३।।

# काली माता

## (वृत्त—इंद्रवज्रा व उपजाति)

तारे नभीं सर्व विझोनि गेले
मेघेंचि मेघाप्रति झाकियेले
सस्पंद अंधार रवा करीतो
सगर्ज वायू भवती फिरे तो ॥१॥

त्या वायुमार्गी किति लक्ष वेडे—
हे जीव मोकाट ! अताचि आले—
कारांतुनी; वृक्ष समूळ ह्यांहीं—
उत्पाटिले; कांहि न मार्गि राही ! ॥२॥

समुद्रही ह्या कलहांत झाला—
सामील; फेकी गगनास काळ्या—
लाटा नगाकार ! भयाण ज्योति—
लकाकुनी दावित तेथ होती— ॥३॥

—सारीकडे मृत्यु कठोर, काळा—
लक्षच्छटांनी ! पसरीत रोगां-
दुःखांप्रती तो करि नृत्यलीला
आनंद-उन्माद तयास झाला ! ॥४॥

---

इ. स. १८९८ च्या सप्टेंबर महिन्यांत, काश्मीरमधील 'क्षीरभवानी' देवीच्या दर्शनानंतर श्रीनगर येथे रचलेल्या 'Kali the Mother' नामक कवितेचा अनुवाद

ये, आइ, यें ! नाम तुझें कराली
प्रश्वास काली ! तव मृत्युशाली !
एकेक हा कंपित पादघात
एका जगा शाश्वत नाश देत ! ॥५॥

तूं कालिके ! सर्व-विनाशकर्त्रि !
ये, आइ, ये ! ज्यासि असेचि छाती—
दैन्यावरी प्रेम करावयाची
मृत्यूस आलिंगन द्यावयाची— ॥६॥

नाशार्थ जें भीषण नृत्य चाले
त्यामाजिं ज्याने सहनृत्य केलें
त्याला,——अशा दुर्लभ भाग्यवंता
भेटेल ही भीषण कालिमाता ॥७॥

❖ ❖ ❖

# अजाणतां आलेले देवदूत

(वृत्त—शार्दूलविक्रीडित)

(१)

ज्याने तीव्र कठोर फारहि अशा दुःखाप्रती सोशिलें
नाही हर्ष कुठेहि ! जीवन जया हें भारसें जाहलें
त्या भारें लवला ! असा कुणि पहा हा हाय हो एकला
अंधाऱ्याहि उदासशा हळुहळू मार्गीं असे चालला ॥१॥

नाही हो मनही तसें हृदयही कांही प्रकाशासि दे
त्याने ना क्षणही हुरूप म्हणुनी कांहीहि चित्तासि ये
अंतीं दुःख-सुखांत, जीवन-मृतीं, सद् वा असत् ह्यांतली
रेषा दावित भेद तीहि बहुधा दृष्टींतुनी लोपली ॥२॥

ऐशा त्यासि सुधन्य एक रजनीमार्गीं दिसे मंदसा
भारी सुंदरसा परी कवडसा तेजःप्रभायुक्तसा
येई जो अपुल्यावरी; कुठुनि वा ना कोण आला कळे
त्यातें 'देव' म्हणोनि नांव करुनी, त्याने तया पूजिलें ॥३॥

आशा, जी नव्हती मुळींच, फिरूना त्याच्या मनीं संचरे
त्याचें सर्व शरीर व्यापित; कधी स्वप्नींहि जो ना शिरे—
ऐसा अर्थ तयासि जीवनिं दिसे; ज्ञातासि व्यापीत तो
त्याच्या सर्व जगासि व्यापुनि पुन्हा बाहेरही राहतो ॥४॥

---

नोव्हेंबर १८९८ मधे कलकत्ता येथे रचलेल्या 'Angels unawares' या कवितेचा अनुवाद

मोठे पंडितशौंड, नेत्रिं करुनी संकेत, त्या हासले
"श्रद्धा अंधचि ही" म्हणोनि वदले ! त्याला स्फुरें आंतलें—
तें सामर्थ्य तशीच शांति हृदयीं; तो शांत दे उत्तरा—
"श्रद्धा अंध मदीय हीच जगतीं धन्या किती ईश्वरा !" ॥५॥

(२)

सत्ता-संपद-वारुणी पिउनिया झिंगे कुणी मत्तसा
हीं दोन्हीं उपभोगिण्या उचितसें आरोग्यही ज्या असा
त्या उन्मादक स्वीय मार्गिं पळतो बेफ़ाम बेछूटही !
अंतीं त्या गमतें "असे सकल ही माझ्याचसाठी मही ! ॥६॥

ज्याला हे 'जग' बोलती असत हो माझा सुखाऽऽराम* हा
हे जंतू, नर मंदगामि, मजला क्रीडार्थ केले पहा !"
अंतीं इंद्रियपंक्ति सर्व विटली ! सौख्यें सहस्रावधि
जीं दीपापरि रंग नूतन असे रात्रंदिनीं दावितीं— ॥७॥

त्याच्या दृष्टिपुढे;—अता नयनिं तीं अस्पष्टता निर्मितीं
तैशीं सर्वहि इंद्रियांप्रति अता तीं वीटही आणितीं
शेखीं स्वार्थचि सर्व काळिज यदा रोगापरी व्यापितो
सौख्या अर्थ न दुःख सोडुनि दुजा कांही तदा राहतो,—॥८॥

नाही कांहिच भावना ! गमतसे तैं इंद्रियाधीन जें
पूर्वी सौख्यदही, महार्घ, असलें जीवीत, तें वाटतें—
मेलें प्रेत जसें अता, सडतसें हातीं असें राहिलें !
टाकूं इच्छि अता ! परी चिकटतें जों जों तयें टाळिलें ! ॥९॥

* सुखाऽऽराम=सुखासाठी तयार केलेला आराम म्हणजे बगीचा—अनुवादक

वांछी, भ्रान्त मनें, सहस्र मरणें नाना परींचीं ! तरी
नांवानेहि खरोखरी परि भितो तो मृत्युला अंतरीं !
ह्याचे नंतर दुःख येउनि महा त्याचेवरी कोसळे
गेलें हो धन ! हाय जाय तशि ती सत्ताहि लोपा बळें ! ॥१०॥

तेव्हा अश्रुनिपात की विव्हळणें ह्यांच्या प्रभावामुळे
नातें मानवतेसवें असत जें त्याचें तया आढळे
आता मित्र जरी तया बहुपरीं चेष्टेमुळे हासले
त्याचे नित्य कृतज्ञ बोल निघती—"हो धन्य हो दैन्य हें" ! ॥११॥

( ३ )

जन्मे स्वास्थ्य सुरेख घेउनि, मनःसामर्थ्य नाही परी
जेणें खोल तशाच तीव्र अपुल्या तो भावना आवरी !
ना वारी लहरी प्रमाथि भरली शक्ती जयांभीतरी
आहे केवळ ज्या "भला" म्हणति की "मायाळु" लोकीं तरी ॥१२॥

त्याने पाहियलें 'मला भय नसे', हे अन्य सारे जरी
चंडां वीचिसवें उगा झगडती ह्या दीर्घ कालान्तरीं
त्याचें चित्त अखेर हो कुजट; त्या जें घाण तें तें दिसे
जैशी पाहुनि अंग खास सडकें माशी तिथे ती बसे ॥१३॥

येई तैं उदयासि भाग्य ! चळला त्याचा परी पाय हो !
त्याने दृष्टि तदीय शाश्वत अशी आता परी साफ हो
आलें त्या कळुनी न पादप तसे पाषाण उल्लंघिती—
केव्हाही नियमा; जसे असति ते तैसेचि ते राहती ॥१४॥

आहे एकचि भाग्यवान नर हा ज्या शक्ति ही लाभली
की लंघोनि समस्त बंध-नियमां भांडोनिया जिंकिली—
ह्याने दैवगती; तदीय गळुनी जाते क्रियाहीनता
त्यातें जीवन तैं विशाल दिसतें तैसें नवें तत्त्वतां ॥१५॥

होतें त्यापुढती विशालतर तें नावीन्यही वाढतें
शेवीं सन्मुख तो प्रकाश उजळूं लागे; छटा लाभते—
तत्-तत्त्वात्मक, शांति शाश्वत जिथे नांदे, तशी धैर्य दे
यत्नांच्या परि सागरासि तरुनी जावें तिथे लागतें ॥१६॥

पाहे तैं वळुनी समस्त करि जें त्या अश्म की ओंडका—
ह्यांचा बंधु, तसेंचि टाळि जग हें ज्याच्यामुळे त्यासि का
ह्यातें कारण तें अधःपतन हो माझें ! असो धन्य तें !
हर्षोत्फुल्ल मनें तया म्हणतसे—"हो धन्य हो पाप हें ! !" ॥१७॥

❖ ❖ ❖

# जिता जागता देव

(वृत्त--शार्दूलविक्रीडित)

जो तूझ्यांत असे, तसाचि जगतीं बाहेरही वावरे
सर्वांहीं करिं कार्य जो करितसे, साऱ्या पदीं संचरे
लोकीं सर्व तुम्ही मनुष्य तितुके ज्याचीं शरीरें असां
तो आहे तव पूज्य; अन्य सगळ्या भंगोनि मूर्ती त्यजा ! १

जो आहे अयि ! उच्च नीच सगळा एक्याचि काळीं जगीं !
पापी, संतहि, ईश्वरापरिच जो आहे किडा-कीटही
आहे सत्य, कळेलसा, दिसत जो, सर्वत्र आहे असा
तो आहे तव पूज्य; अन्य सगळ्या भंगोनि मूर्ती त्यजा ! २

ज्याच्या आंत कधीहि नाहि घडला मागील रे जन्मही
किंवा नाहि पुढेहि जन्म, अथवा नाही जिथे मृत्युही
होतों एक जयांत, ज्यांत पुढतींही एक राहूं सदा
तो आहे तव पूज्य; अन्य सगळ्या भंगोनि मूर्ती त्यजा ! ३

मूढांनो ! करिता जिवंत प्रभुची ऐसी उपेक्षा ! तशी—
त्याच्या ह्या जगिं कोंदल्या अगणिता बिंबात्मिका मूर्तिंची !
हा आहे तुज एकमात्र इतुका जो दृश्य, तो देव गा
तो आहे तव पूज्य; अन्य सगळ्या भंगोनि मूर्ती त्यजा ! ४

(द्रुतविलंबित)

पळतसां धरण्या तुम्हि सावल्या
असति केवळ ज्या मनिं कल्पिल्या
मिळत एकचि केवळ ह्या फळ
कलह आणिक युद्ध अमंगळ !

❖ ❖ ❖

---

९ जुलै १८९७ रोजीं एका अमेरिकन मित्राला अल्मोऱ्याहून पाठविलेल्या 'The Living God' नामक कवितेचा अनुवाद

# हे धन्य स्वप्ना !

(वृत्त—इंद्रवज्रा व उपजाति)

चाले सुखें सर्व, बिघाड होई
आनंद अंतीं जरि लब्ध होई
दुःखार्णवा वा जरि ये उधाण
आहे हरेकासि तिथेच काम— १

हसो रडो वा मग कोणि तेथे
पात्रासि वेषा करणेंचि होतें
प्रवेश—तें नाट्य—असेंचि चालें !
प्रकाश, वृष्टी, नित चक्र झालें ! २

हे स्वप्न रे ! हे मम धन्य स्वप्ना !
फेकी तुझ्या अंधुकशा पटांना—
सर्वत्र, सौम्या करि उग्र रेषा
दृग्‌तीव्र त्या देइच स्निग्ध वेषा ३

तुला त्यजोनी जगिं जादु नाही !
स्पर्शें प्रफुल्ला मरुभूमि होई !
हो घोरसें गर्जन गोड गीत !
तो दुष्ट मृत्यू "मृदु मुक्ति" होत ! ४

❖ ❖ ❖

१७ ऑगस्ट १९०० रोजीं पॅरीसहून कु. ख्रिस्टीन ग्रीनस्टाइडेल यांना लिहून पाठविलेल्या 'Thou Blessed Dream' या कवितेचा अनुवाद

## प्रकाश

(वृत्त—उपजाति)

मागे तसा मी बघतों पुढेही
आहे दिसे ठीकचि सर्वकांही
मद्दुःख जेव्हा अति तीव्र होत
प्रकाश-आत्मा असतोचि आंत ॥१॥

❖ ❖ ❖

---

२६ डिसेंबर १९०० रोजीं कु. जोसेफाइन मॅक्लिऑड यांना बेलूर मठांतून पाठविलेल्या पत्रांतील 'Light' नामक कवितेचा अनुवाद

# वेळे-आधीं उगवलेल्या पुष्पास

(वृत्त--पृथ्वी)

असे हिममया धरा जरिहि गार शय्या तुझी
तुझें वसन, गोठवी असलि शीत झंझा जरी
न संगत पथीं जरी कुणि हुरूप द्याया तुला
तुझा जरि सुगंधही विखुरिला वृथा जाहला— १

स्वयेंचि जरि प्रेमही करि निराश तूंतें फुला !
तुझा जरि सुगंधही विखुरिला वृथा जाहला
जरी जगिं भल्यावरी सरशि वाइटाचीच हो
कुराज्य सुगुणावरी जरिहि दुर्गुणांतें मिळो--२

तरी न बदली कधी तव स्वभाव सौम्या फुला !
अगा मधुर रे ! फुला ! अयि नितान्तशा निर्मला !
परी सतत ओत रे मधुर गंध तूझा सख्या !
कुणीहि नच मागतां, न हटतां; धरी निश्चया ३

❖ ❖ ❖

---

६ जानेवारी १८९६ रोजीं न्यू यॉर्कहून एका पाश्चात्त्य शिष्येला पाठविलेल्या 'To An Early Violet' नामक कवितेचा अनुवाद

# शान्तींत विश्रान्ति मिळो तुला रे !

(वृत्त—गीति)

तारा-मंडितमार्गी जीवा ! जाई सवेग तूं गतिने
जाई शान्तिमया रे, विचार जेथे स्वतंत्र नित्य बने १

काल-स्थल बा, जेथे झाकळिती ह्यापुढे न दृष्टीतें
शाश्वत शान्ति मिळो तुज, द्यावे आशीः ते तसे प्रभुने २

सत्य तुझी सेवा ही, त्यागहि तूं पूर्ण सर्व केलासे
सृष्टीहुनि पर हृदयहि गेह मिळो प्रेमपूर्ण तुज तैसें ३

स्मृति ती तुझी मधुरशी काल-स्थल सर्व नष्ट जी करिते
पूजा-सुम-सौरभशी तुजमागे ती अभाव तव भरिते ४

तव बंधनें तुटोनी, शोधिलि ती, शान्ति लाभली तुजसी
जो जन्म-मृत्युरूपें ये तद्रूप तूं अता बनसी ५

हे उपकारी जीवा ! तूं होता त्यागि नित्य पृथ्विवरी
सद्गति !! झगडें जें जग, प्रेमें तूं त्या पुढेंहि साह्य करी ६

❖ ❖ ❖

ऑगस्ट १८९८ मधे श्री. जे. जे. गुडविन ह्यांच्या स्मृत्यर्थ लिहिलेल्या 'Requiescat in Pace' नामक कवितेचा अनुवाद

# इथे खेळ माझा असे संपला !

(वृत्त—सुमंदारमाला)

सदा मी चढें की सदा मी पडें कालवीचींसवें जात, वाहें पुढे
विनाशी-विनाशीच दृश्यांतुनी जीवनस्रोतिं ओहोटि-वाढीमुळे
अहो ! त्रासलों शाश्वता शक्तिला ह्या; न आता गमे दृश्यपंक्तींत ह्या !
न पोचे ! सदा वाहते ! ना किनारा दुरूनीहि अस्पष्टही दृश्य वा ! १

इथे तिष्ठलों जन्म-जन्मों परी द्वार हें हाय ! हो ना कधीहि खुलें !
अती काळ शोधीं श्रमें व्यर्थ मी एक रश्मी ! तयें चक्षु मंदावले !
लघू, तुंग, रुंदी न ज्या आयुसेतूसि, तेथे उभा पाहतों खालतीं
झटे, हा हसे, वा रडे, लोक सारा ! कशासाठि ? कोणी न हें जाणती ! २

पुढे द्वार; मुद्रा दिसे क्रुद्ध उग्रा; म्हणे तें "तुला मार्ग नाही पुढे
इथे संपलें ! तूं नको दैव छेडूं ! भलें सोस आता जसें सोसवें
तयांमाजि जा; एक हो ! पी द्रवा तूंहि, त्यांचेचि तोडीसि वेडाहि हो
धजे जाणण्याला, सदा दुःख त्याला ! म्हणोनीच तूं थांब; त्यांसंगि हो" ३

परी हाय ! मातें न घेतांचि येते मुळी कांहि विश्रान्ति; हा बुद्बुद—
धरेचा तरंगे ! रिकामाचि आकार ! ही घे रिकाम्याचि नामाप्रत !
रिकामा तिचा जन्म तैसाचि मृत्यू ! मला सर्व हें फोलसें वाटतें !
कढे जीव नाम-स्वरूपाचिया फोल सोलोनि साली सराया पुढे ! ४

---

इ. स. १८९५ च्या वसंतांत न्यू यॉर्क येथे लिहिलेल्या 'My Play Is Done' या कवितेचा अनुवाद

अहो ! द्वार खोला ! मला द्वार खोलोनि हें प्राप्त झालेंचि हो पाहिजे !
जगद्धात्रि गे ! तूं प्रकाशात्मरूपी मला खोलुनी द्वार हें देच दे
तुझा बाळ मी हा थकोनीच आई ! घरीं पातलों जो पुन्हा त्याजला !
कढें मी, कढें मी घरीं यावयाला !!--इथें खेळ माझा असे संपला ! ५

तमीं त्वां मला बाहिरीं धाडिलें खेळण्याला, तदा घेतलें भीषण--
तुवां रूप हीं !--जाय आशा ! भरे भीति !...हें लादलें काम !
हा खेळ न !
दिशेला दिशेला मला फेंकिला तीव्र वृत्तींचिया, खोल दुःखांचिया--
तरंगावरोनी तरंगावरी ह्या महासागरीं राक्षसी कोपल्या ! ६

असे दुःख हें आज !...आनंद केव्हा तरी तो पुढे ! मृत्यु जीवीत हें--
असे जेथ साक्षात् ! तसा हाय ! मृत्यू न जाणो असे पर्व वा हें नवें--
पुन्हा चालुं होणार येथे फिराया पुन्हा चक्र तें फार जें हो जुनें
सुखाच्या तसें नित्य दुःखाचियाही मिषें घ्यावयालागि आवर्तनें ७

इथे बालकां स्वप्नराजी दिसे उज्ज्वला तेवि हेमापरी रम्य जी
अती शीघ्र त्यातें परी आढळे अंतिं मातीच हातीं उरे हो तिची !
वळोनी तदा मागुती पाहती सर्व आशा कधीच्याच त्या भंगल्या !
गमे सर्व आयू तयां आयसाचा जणों ढीग जंगी असे गंजला ! ८

उशीरा कळे जीवनीं फार हें ! आम्हि ना जों पुरें चक्रही सोडितों--
नवा तो युवासंघ तों येउनीया स्वसामर्थ्य सारें तया लावितो !
दिसामागुनी दीस, वर्षावरी वर्ष, ऐशापरी चक्र चालेंच हें
भ्रमाचें असे खेळणें मात्र हें ! हें भ्रमाचें असे खेळणें--खेळणें ! ९

असे चालिका खोटि आशा तया ! त्यासि 'बुंधा' असे वासना; हर्ष की--
तसें दुःख 'आरे'; वरी वाहतों मी; कुठे चाललों हें कळेना मुळी !
मला वांचवी अग्निदिव्यांतुनी ह्या ! मला सोडवी ! आइ गे ! आइ गे !
दयाळे ! नको वाहुं देऊं मला वासनांच्या वरी ह्या प्रवाहासवें ! १०

नको उग्र तें रूप दावूं तुझें ! ना मला आइ गे ! पाहवें तें मुळी
दयाळू तशी प्रेमळा हो मला; तूं क्षमेनेच वाक्ताडनातें करीं--
चुकांसाठि माझ्या; मला नेइ आई ! तया तीरिं जेथें सदा बंद हो--
बखेडा ! असे, दुःख-अश्रू सुखेही जगाचीं, तयांच्याहि गे पैल जो ११

न त्या वैभवा व्यक्त येतें कराया रवीला, शशीला, न तारांप्रती--
विभादीप्त ज्या, ना विजेला; तयाची परावृत्त आभाचि हे दाविती
भ्रमभ्रान्त स्वप्नें पुन्हा ना कधी त्वन्मुखा-आड येवोत हीं आइ गे !
असे खेळ माझा इथे संपला !! तोड ह्या शृंखला ! मुक्तता आइ ! दे १२

# मौजेचा पत्रव्यवहार

## पत्र पहिलें

(श्रीस्वामीजींचें मेरीला)

(वृत्त—अनुष्टुप्)

आता तूं भगिनी मेरी ! दुःख चित्तीं करूं नको—<br>
माझ्या ठोश्यांमुळे तीव्र; पूर्ण तूं परि जाणसी— १<br>
—तुम्हांतें आवडे तरिही तें मुखें मींच सांगणें—<br>
तुम्हांवरि जिवेभावें पूर्ण, की, प्रेम मी करीं २

मूळ इंग्रजी 'Interesting Correspondence' नामक कवितांचा हा अनुवाद आहे. ह्या पत्रव्यवहाराचें खरेखुरें स्वारस्य लक्षांत येण्यासाठी, ज्या प्रसंगामुळे तो घडून आला तो प्रसंग, आणि तो ज्यांच्यांत झाला त्यांचा परस्परांशीं असलेला संबंध, ह्या गोष्टी वाचकांस सांगून ठेवणें आवश्यक आहे. अगदी पहिल्या पत्राच्या प्रारंभींच स्वामीजी हे, आपण ज्या व्यक्तीला पत्र लिहीत आहोंत त्या व्यक्तीला "तीव्र ठोसे" दिल्याविषयी बोलत आहेत. हे "ठोसे" म्हणजे दुसरें तिसरें कांही नसून फक्त १ फेब्रुवारी १८९५ रोजीं लिहिलेलें एक फार कडक असें पत्र होतें. ह्या पत्रांत स्वामीजींनी आपली बाजू कशी बरोबर आहे हें प्रतिपादन केलें होतें. एका संन्याशाच्या वृत्तींतील जाज्वल्यतेने भरलेलें असें हें फार सुंदर पत्र असून, ह्या 'मौजेचा पत्रव्यवहार' वाचण्यापूर्वी वाचकांनी कृपया तें पत्र वाचावें. ज्या मेरी हेलला हें पत्र लिहिलेलें आहे ती श्रीयुत हेल व श्रीमती हेल ह्यांच्या दोन मुलींपैकी एक होती. ह्या श्रीयुत हेल ह्यांना व श्रीमती हेल ह्यांना, स्वामीजी (मौजेने) 'फादर पोप' आणि 'मदर चर्च' म्हणत असत. हेल ह्यांच्या ह्या दोन मुली आणि त्यांच्या दोघी चुलतबहिणी ह्या स्वामीजींना बहिणीप्रमाणे असत; आणि त्याहि मुली स्वामीजींविषयी फार

ग्रा. क.

पैज मी मारुनी सांगें मुली ज्या सर्वही तुम्ही
सर्वोत्तम मला ज्या की जगीं मैत्रिणि लाभल्या— ३

धरोनी मज राहाल सुखीं वा दुःखिही तशा
करीन मीहि तैसेंच, तुम्हांही ठाउकें असे ४

टोचणी चित्ति ना होतां भीति ना धरितां मुळी
जीव, नांव, तशी कीर्ती, उपेक्षीनच स्वर्गही— ५

सर्वश्रेष्ठा उदात्तत्वीं, सत्यींही, दृढ, उत्तमा
चार ज्या बहिणी गोड त्या तुम्हांसाठि मेरि गे ! ६

दुखावला कुणी नाग काढितो तर तो फणा
चाळिला जाळही तैसा जास्त उज्ज्वल होतसे ७

क्षोभलें चित्त ज्याचें त्या सिंहाच्या क्रोध-गर्जनीं
वायुमंडलिं रानाच्या घोळतात प्रतिध्वनि ८

विजेने फाडिली छाती ज्याची तो घन खर्चुनी—
आपुलें सर्व सामर्थ्य * वारींचे पूर वर्षतो ९

चाळिला जातसे आत्मा तळापर्यंत हालुन
व्यक्त तैं होति थोरांचे उत्तमोत्तम जे गुण १०

---

प्रेम व आदर बाळगीत. स्वामीजींचीं कांही सर्वोत्तम पत्रें ह्या मुलींना लिहिलेलीं आहेत.

प्रस्तुत पत्रव्यवहारांत स्वामीजी खेळकर, अगदी मानवी भावनांनी युक्त, पण ब्रह्मज्ञान ह्या आपल्या जीवनाच्या केंद्रभूत कल्पनेला सर्वस्वी धरून असलेले, अशा एका नव्याच स्वरूपांत दिसून येतात. ह्या 'मौजेच्या पत्रव्यवहारां'तील पहिलें पत्र १५ फेब्रुवारी १८९५ रोजीं न्यू यॉर्कहून लिहिलेलें आहे.

* पाठभेद :—आपुलें जल-सामर्थ्य

दृष्टी झाकळुनी जावो, काळीजा दुर्बलत्व यो
ठरूं दे मित्रही खोटे, दगा प्रेमीहि देउं दे ११
महाभयद-र्शी दैवा धाडूं दे शत संकटें
घनीभूत तमानेही मार्ग तो रुद्ध होउं दे-- १२

निसर्ग कोपुनी सारा, चूर्णही करण्या तुला
क्रुद्ध मुद्रा धरो,—माझ्या आत्म्या रे ! तरि जाण हें-- १३
दिव्य आहेस तूं ! मार्गा आक्रमी, आक्रमी पुढे
न डावें उजवें जाई, थेट ध्येयाकडेचि जा १४

देवदूत नसें मी, ना पशुहि, न मनुष्य मी
ना मी चित्त, न मी देह, नाही स्त्री ना पुमान् तसा १५
ग्रंथ मौनावले येथे, आश्चर्यें स्तब्ध जाहले--
मत्स्वरूप कथायातें; "सोहम् !" मी "तो"-चिह्नो असें ! १६

सूर्यापूर्वि, शशीपूर्वी, धरेच्या पूर्विही तसा
नक्षत्रापूर्वि, मी आधी स्वतंत्र धूमकेतुच्या १७
काळाचाहि नसे झाला जन्म जेव्हा तदाहि गे
"मी" होतों, आजही आहें, आणि राहीनही पुढे ! १८

धरा ही सुंदरा, सूर्य तेजस्वी अंबरांतला
शांत गोड शशी तैसा, लुकलुकें नभही असें-- १९
'कार्य-कारण-भावां'-नी आकाशीं धावतात हे
बंधनांतचि राहाती, बंधनीं मरतात हे २०

स्वप्नात्मक असें जाळें फेकुनीया तयांवरी
झाकितें चित्त हें त्यांतें घट्टही धरितें तयां २१
बाणा-ताणा विचारांचा त्यांत ह्यां बसवीतसे
पृथ्वी, स्वर्गहि, की नर्क, हीन थोर अती, असे २२

जाणा गे, सर्व आहेत पापुद्रे वरचेच हे
स्थल-काल असे दोघे, सर्व कार्यहि कारण २३
इंद्रियांच्या, विचारांच्या, सर्वांच्याहि पलीकडे
गे, असे सर्व विश्वाचा साक्षी केवळ एक "मी" ! २४

ना अनेक, नसे दोन, आहे केवळ एक "मी"
ह्या रितीं माझिया "मीं"-त "माझे" आहेत सर्व 'मी' २५
द्वेष ना करुं ये मातें, टाळितांही न ये मला
कैसा मी मजला टाळूं ?—प्रेम केवळ शक्य तें ! २६

जाग्या स्वप्नांतुनी व्हा गे, बंधनांतूनि मुक्त व्हा
भिऊं नका मुळी ह्यातें—हें जें गूढ असें दिसे— २७
छाया ही मम आहे गे, ना मातें भिववूं शके
एक-निश्चिति जाणा की "सोहम्" ! मी "तो"-चि
हो असें ! २८

चला ! येथवर हें आमचें "काव्य" झालें ! तुम्ही सर्व खुशाल असाल अशी आशा आहे. आईना आणि 'फादर पोप' यांना माझा सप्रेम नमस्कार कळवा. जीव जाईल इतका मी हल्ली कामांत आहें ! आणि जवळजवळ एक ओळहि लिहायला मला वेळ नाही. तेव्हा, ह्यानंतर पत्र लिहायला मला जर थोडा-बहुत उशीर झाला, तर मला क्षमा करा.

सदाचाच तुमचा
विवेकानंद

## पत्र दुसरें

(मेरीचें श्रीस्वामीजींना)

(मुक्तछंद)

संन्याशाला वाटलं की... आपण कवि व्हावं
कवितेची केलि त्यानं... फार फार आर्जवं
विचार आणि भाषा ह्यांत... त्यानं तिला जिंकली !
पण मात्र अचडण... वृत्ताची त्यां नडली ! ॥१॥

चरण त्याचे कवितेंत.. असेच होते सारे
खूप अखूड, खूप लांब !... अन् न जमणारें——
बाह्यरूप गायनार्था !... मग लागे प्रयोगांत——
केलं त्यानं सुनीत, अन् .. केलं भावगीत
केलं अहो, "महाकाव्य" !... केलें श्रम त्यांत——
इतके त्यानं झटून की——... पचन गेलं मातींत ! ॥२॥

लिऑन्नं* जें प्रेमानं अन्... काळजीपूर्वक केलं
स्वामींसाठी रुचीयुक्त... खाणं होतं बनवलं
शाकाहारी तेंहीसुद्धा - भोजन त्यांनी सोडलं
जोंवर त्यांना कवितेचं... वेड होतं भरलेलं ! ॥३॥

एके दिवशीं होते स्वामी... एकटे असे बसलेले
डोक्यामध्ये विचारांचें... चक्र होतें चाललेलें
एकाएकी भोवतालीं.. वेढिलें त्यां दीप्तीने !
तो "शांत मंद आवाज"... स्फुरण दे विचारातें
शब्द त्यांचे चमकती .. निखारे ते हो आगीचे ! ॥४॥

* लिऑन लँड्स्बर्ग, स्वामीजींचे एक शिष्य. हे कांही दिवस स्वामीजींजवळ राहत होते.



७५२०५ नि. काव्य

अग्निमय निखारे ते...जळते जळते ठरले !
जी मी स्वामी ! पश्चात्तापें...आधीच आहें पोळलेलें
त्याच माझ्या शिरावरीं...निखारे ते बरसले !
लिहीलें मीं अद्वातद्वा...आता मज तें दुःखा दे
क्षमा अपुली स्वामीजी मी...वारंवार हो याचीतें ! ॥५॥

चार आपल्या बहिणींना जें...लिहिलं आहे, हो, आपण
निश्चिती ही असू द्या की...नित्य त्या करतील जतन
कारण, आपण नयनांना...स्वच्छ त्यांच्या दाखवलं
मुख्य सत्य हें की, सारं...ईशतत्त्वच भरलेलं ! ॥६॥

## पत्र तिसरें

(श्रीस्वामीजींचें मेरीस)

(अनुष्टुप्)

पुराकाळीं जान्हवीच्या तीरीं वृद्ध असा कुणी ।
उपदेष्टा करी बोध,—"देव हे राम-जानकी ॥१॥
घेति हे अवतारांतें;कोमला जानकी रडे—।
विरहें व्याकुला;" त्याचा उपदेश यदा सरे ॥२॥
श्रोते घरा निघाले ते विचारीं गुंगले असे ।
तेव्हा त्या जनसंमर्दीं मोठ्याने प्रश्न ऐकु ये ॥३॥
विनवोनी पुसे कोणी जिज्ञासायुक्त होउनी ।
"महाराज ! परी सांगा रामाची कोण जानकी—॥४॥
होती ही ? ज्यांवरी झालें आपुलें सर्व भाषण ।
जयांचेविषयी केला आम्हांतें बोध आपण ?" ॥५॥

तसें, मेरी, तुला सांगें, ऐक, हानी करीसि तूं—।
मतां मम, चुकीचीं तीं, मूळा सोडुनि, मांडुन ॥६॥

कधीहि शिकवी ना गे, मी विचित्र मता अशा।
की, 'सर्व देव हा आहे'; अर्थहीन प्रलाप हा! ॥७॥

हें परी मी म्हणें मेरी! ध्यानीं हें राहुं दे अता।
ईश गे, सत्य तो आहे, बाकी कांहीच नाहि हें ॥८॥

हें जगत् स्वप्न गे, आहे, खरेसें दिसतें जरी।
सत्य केवल 'तो' एक अस्तित्वीं जो असे खरा ॥९॥

खरा "मी" त्याहुनी कोणी अन्य नाहीच नाहि गे।
जड द्रव्य विकारी हें कधीही नाहि नाहि मी ॥१०॥

अविनाशी मम प्रेम, माझी तैसी कृतज्ञता।
तुम्हां सर्वांप्रती, ऐसा विवेकानंद तोच मी ॥११॥

## पत्र चवथें

### (मेरीचें श्रीस्वामीजींस)

### (मुक्तछंद)

'भट' आणि 'कानभट'...भेद ह्यांच्यामधला
तुम्हीं आहे दाखवला...पूर्ण मला कळला !!
सिद्धान्त आहे छानच !...पण खरोखर सांगतें
पाणी इथे पार माझ्या...डोक्यावरून जातें !
पौर्वात्यांचें तुमचें हें...तर्कशास्त्र आहे !
स्पष्ट मला होत नाही !...अशी स्थिति आहे ! ॥१॥

देवच जर खरा अन्...बाकी सर्व नाहीच
जग आहे स्वप्नच हें...घडवलेलें मायेचंच
राहील काय अस्तित्वांत...जें स्वयं देव नाहीच ?
ज्यांना "नाना" दिसे त्यांना...भय फारच आहे
तोच फक्त जगे ज्याला..."एक" विशद आहे
म्हणून, माझ्या मतिनं अल्प,...पुन्हाहि मी म्हणतेंच हें—
मी जर आहें देवांत,...अन् देव माझ्यांत आहे
मग तर मला हेंच दिसतें, ——...देवच सर्व आहे ॥२॥

## पत्र पांचवें

(श्रीस्वामीजीचें मेरीस)

(अनुष्टुप्)

शीघ्रकोपी, अद्वितीय, निसर्गाची चमत्कृति ।
लावण्यें युक्त, ना शंका; कुमारी मेरि ही अशी— ॥१॥
आहे दुर्मिळसा जीव; भावना खोल आपुल्या——।
न ती दाबुं शके; येती चोरुनी अन्ति बाहिरीं ! ॥२॥
स्वतंत्र जीव हा आहे! भविष्यीं हें दिसे मला ।
जीव हा निश्चयें आहे अग्निद्रव्येंचि ओतिला ॥३॥
काव्यशक्ती तिची गर्जे कवनें तीं किती जरी ।
पियानो वाजवी तैसा ! तरी थंडचि काळिज !—॥४॥
इतुकें की सन्निधीं ये प्रियाराधनहेतुने—।
मूर्ख जो निश्चयें नित्य गारठूनचि जात तो ! ॥५॥
जरी मी, भगिनीं मेरी ! ऐकतों लोक बोलतां ।
जो प्रभाव तुझें रूप गाजवीतें जनांवरी ॥६॥

सावधान अता राहीं; कितीहि मधुरा जरी——।
शृंखला असल्या मेरी ! माथा तूं नम्र ना करीं ॥७॥
कां की, शीघ्रचि इच्छेशीं त्या वेड्या प्रेमिकाचिया ।
खटकाचि उडावा——की त्वत्-शब्दें चूर होउनी— ॥८॥
कांही सूर निराळाच ऐकणें पडुनी तया ।
नाश गे, जीवनाचा त्या, भीत मी, पूर्ण होइल ! ॥९॥
"जसें द्यावें तसें घ्यावें" न्यायें ह्या, भगिनी अये !
मेरि गे ! मुक्त हस्ताने देत मी, घेइं पंक्ति ह्या ! ॥१०॥
आहे मर्कट-भाषा गे, जी ही बोलत मी असे ।
याद राख, परी हेंही संन्याशीच करूं शके ! ॥११॥

# 'प्रबुद्ध भारता'स

(वृत्त--भुजंगप्रयात)

पुन्हा एकदा जाग ! होता न मृत्यु
तुला लागली झोंप होती, परंतु--
असे ती फिरोनी तुला द्यावयाला
जगामाजि येथे नव्या जीवनाला-- १

तुझ्या पद्मनेत्रां तसा द्यावयाला—
विसावा; तुला ह्याहुनी दाविण्याला
नवी धाडसी स्वप्नराजी विशाला
तुझी वाण ही जाणवे रे जगाला ! २

जगत् हें तुझी अंतरीं वाट पाही
अगा सत्यरूपा ! तुला मृत्यु नाही !
करी कूच चालूं तुझा रे पुन्हा तूं
अशा पावलीं सौम्य चालें परंतु— ३

जयें नीच जी धूळ मार्गीं कडेची
न हो भग्न विश्रान्त-शान्तीहि तीची
तरी तूं दृढत्वें स्थिरत्वेंहि राहीं
असो शान्ति, स्वातंत्र्य, की धीरताहि ४

'To the Awakened India' कवितेचा अनुवाद. इ. स. १८९८ मध्ये जेव्हा 'प्रबुद्ध भारत' मासिकाचें प्रकाशनकार्य मद्रासहून हिमालयांत अल्मोऱ्याला नेलें गेलें, आणि 'श्रीरामकृष्ण-संघा'च्या स्वाधीन केलें गेलें, तेव्हा त्या मासिकासाठी स्वामीजींनी ही कविता लिहून पाठविली.

प्रबोध-प्रदात्या ! पुढे नित्य जाई
तुझी वाणि हेलावणारी वदेहि
तुझें गेह गेलें ! जिथे बाल्य गेलें
सुहृत् प्रेमळांनी तुला वाढवीलें ५

तुला वाढतां हर्षुनी देखियेलें
बली दैव होतें परी रे निराळें !
जगाचा परी हाच रे नेम आहे
पुन्हा उद्भवाच्या स्थळीं येत आहे—६

जगीं सर्व कांही फिरोनी वळोनी
स्वशक्तीं करायासि ताजी-तवानी
म्हणोनी फिरोनी करी "श्रीगणेशा"
जिथे जन्म झाला तुझा पूर्वि ऐशा— ७

इये भूमिमार्जी, जिथे मेघराजी
हिमाच्छन्नशा सानुला वेढिते जी
हिमाद्री असा भव्य, आशीर्वचाला
स्वसामर्थ्यही देत तैसाचि तूला ८

तुझें कर्म, —इच्छा तया एवढीच,—
नव्यानेहि आश्चर्यकारी घडोच
स्वरातें तुझ्या स्वर्धुनी ऐसि लावो
अमर्त्या तिच्या गानिं तो एक होवो ! ९

तुला सावल्या देवदारू तरूंच्या
तिथे शाश्वता शान्ति देवोत साच्या
परी होउ सर्वाहुनी एक आधी
नगाधीश-बाला उमा सौम्य-रीति,—१०

विशुद्धा, वसे शक्तिरूपें समस्तीं,
अशी आइ, चैतन्य जी सर्वभूतीं
जगांतील जी कर्म सारें करीते
तया एक पूर्णा जगद्रूप देते ११

जियेची दया द्वार सत्यासि होतें
असे एक सर्वत्र हें दाखवीते
थके ना अशी शक्ति देवो तुला ती !
अमर्याद जें प्रेम ती तीच शक्ति ! १२

तुला सर्व देवोत आशीर्वचा ते
महाथोर द्रष्टे, अगा ! थोर द्रष्टे
न ज्या स्थान की काल हे बांधितात
नरां, सर्व वंशासि, जे होति "तात" १३

जयीं त्याच सत्याचिया हृद्‍गताला
असे जाणिलें, आणि धैर्यें नराला
कडू-गोड शब्दांत तें बोधियेलें
तयांच्याचि सेवाव्रता त्वां धरीलें १४

तुला "गुह्य" तें "ज्ञान" आहेच चोख
असे हेंच तें की, 'असे सर्व एक !'
म्हणोनी, प्रिया ! त्वद्वचा बोल आता
तुझा सौम्य गंभीर आवाज येतां— १५

पहा, भास, स्वप्नावरी स्वप्न, कैसें
पुटेंच्या पुटें, शून्यदेशीं पळे तें !
उरो अंतिं रे सत्य,—रे फक्त सत्य
प्रकाशोचि तें वैभवीं स्वीय नित्य १६

जगा, आणि, संदेश तूं हाच सांग
उठा ! 'जागृही ! !'—हा पुरे स्वप्नरंग !
जगत् हें असे स्वप्नभू ! कर्म येथे
कडू-गोडशा आमुच्या हो करीतें— १७

असूत्रा विचारांचिया पुष्पमाळा !
न बुंधा, न की मूळही ज्या विचारां !
मुळी आधि शून्यामधे जन्मले ते !
जराही हळू सत्य फुंकी तयातें— १८

क्षणी स्थान जें मूळ त्या पावतात
क्षणीं मूळ शून्यामधे लोपतात !
धरी धैर्य; सत्यासि तूं तोंड देई !
स्वयें तूंचि सत्यासवें एक होई !' १९

तुझीं सर्व स्वप्नें अता तीं सरोत !
जरी हें तुझ्याने न यत्नेंहि होत
तरी हींच सत्यात्म स्वप्नें पहा बा
खरें 'शाश्वत प्रेम' की 'मुक्त सेवा' ! २०

❖ ❖ ❖

# पेला

(वृत्त – शार्दूलविक्रीडित)

पेला हा तव; हा तुझा ठरविला प्रारंभकालींच गा
ना ! मत् बालक ! जाणतों असत ह्या पेयांत काळ्या तुझ्या —
तूझी स्वीय कृती किती,—अति जुनी, दोषात्म कामात्मही
त्या साऱ्या गहिऱ्या 'गतां'-तिल; मला माहीत हें सर्वही १

हा आहे तव मार्ग—दुःखमय की हा रुक्षही फार रे
ना विश्रान्ति जयीं तुला, दगड ते मीं——मींच केले बरें !
मित्रातें तव मीं सुखी करुनिया निर्विघ्नसा ठेविला
अंतीं येईल तोहि त्वत्सम मदीया आश्रया घ्यायला २

हे बाला मम ! मार्गि ह्याच परि रे आहे तुला चालणें
हें आहे तव कार्य; हें असत रे आनंद-गोडीविणें !
अन्यें ना करणें परी; असत रे विश्रांत माझ्या स्थळ—
त्यातें निश्चितसें; म्हणोनि जगिं घे स्वस्थान तूं निस्तुळ ३

'The Cup' या कवितेचा अनुवाद

(वृत्त–अनुष्टुप्)

मी म्हणे न तुला "बाला ! ज्ञानें हें सर्व आकळी ।"
"पाहण्या मन्मुखा," सांगे, "नेत्रांची झाक पाकळी"४*

❖ ❖ ❖

* अथवा:—

(वृत्त–द्रुतविलंबित)

नच म्हणे तुज मी "अयि बालका !
मन-बळें सगळें समजें अगा !"
तुज म्हणे "बघणें जरी मन्मुखा
नयन झाकुनि घे तरि बालका !" ४

# चार जुलैला उद्देशून

(वृत्त—भुजंगप्रयात)

विरोनी पहा कृष्ण हे मेघ गेले
निशाकाळिं दाटोनि जे फार आले
तदा प्रेतवस्त्रापरी हे उदास
नभीं कोंदले झाकुनीया धरेस १

करस्पर्श तूझा करी जादु खास
तयें आज ह्या जागवीलें धरेस
मिळोनी अता सर्व हे पक्षि गाती
फुलें हीं तुझ्या स्वागतातें करीतीं २

तयासाठि त्यांनी शिरें उंचवीलीं
दवांनीच ओलीं अशीं हालवीलीं
नभींची जणो भासली तारकालि
फुलांनी तुझीं स्वागतें ऐसि केलीं ३

सरांनी तुझ्या स्वागतातें कराया—
मनापासुनी, आपले नेत्र राया !
कुमुद्रूप लाखोहि उत्फुल्ल केले
तुझें प्रेम ज्यांच्यांत ओथंबलेलें ४

---

'To the Fourth of July' नामक कवितेचा अनुवाद. ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन आहे. कांही अमेरिकन शिष्यांसमवेत काश्मीरांत स्वामीजी प्रवास करीत असतां ४ जुलै १८९८ इ. रोजीं सकाळीं न्याहारीच्या वेळीं अचानक वाचून दाखवून त्यांना चकित करण्यासाठी स्वामीजींनी ही कविता त्या दिवसाला उद्देशून लिहिली.

प्रकाशप्रभो ! स्वीकरी स्वागताला
नव्या स्वागता देतसों आज तूला
अगा सूर्य रे ! आज तूं तो करीसी
जगाचे वरी पूर्ण स्वातंत्र्यवृष्टि ५

विचारा करीं, की किती निश्चयाने
तुझी पाहिली वाट रे ह्या जगाने
तसा भिन्न कालीं स्थलीं भिन्न किंवा
तुझा शोध केला किती दीर्घही वा ६

कुणीं त्यागिलें गेह, प्रेमासि तैसें—
कुणीं मैत्रिच्या त्यागिलें, शोधण्यातें—
तुला ते निघाले; स्वतां हद्दपारी
स्वतांसाठि घ्यायासि केली तयारी ! ७

समुद्रांतुनी जाति मोठ्या भयाण
अती घोर ऐशा अरण्यामधून
पदाला पदा मृत्युशीं-जीवनाशीं
करावें अहो ! लागलें युद्ध त्यांसी ८

तदा दीस आला ! कृती ये फळाला
अहो ! प्रेम, पूजा, तसा त्याग केला
मिळे सार्थका, स्वागता, पूर्णतेला
तुझा मंगला ! लाभ झाला नभाला ! ९

मनुष्यावरीं सर्व तूं फेकियेलें
प्रकाशासि स्वातंत्र्यरूपी अगा रे !
पुढे जा ! पुढे जा ! प्रभो ! मार्गिं तूझ्या—
अरुद्धा गतीनेचि माध्यान्ह तूझा— १०

नभा जोंवरी ह्या समस्ता जगाच्या
पुरा व्यापि, की देश सारे तुझ्या त्या—
प्रकाशा परावृत्त हर्षें करीती
मनुष्यें, स्त्रिया, उंच माना धरीती— ११

जयांचीं तयां बंधनें क्रूर होतीं
अशा शृंखला भग्न झाल्या पहाती
तसें वाटतें त्यांसि हर्षोत्सवाने
जगूं आम्हि आता नव्या जीवनाने ! १२

# जगन्मातेचा खेळ

(वृत्त–भुजंगप्रयात)

कुणा ठाउकें ? सिद्धही तूं असावा !
विना-नाद सारा अमोघास्त्र-ठेवा—
स्वतांचा जिथे आइ ती गुप्त ठेवी
तिथे खोल छाती कुणा जावयाची ! १

उडी घेउनीया पुढे जाउनीया
अमोघा महाशक्तिशीली बनाया—
जगाच्या घडामोडि, ज्या सिद्ध झाल्या
पटामागल्या सावल्या कंपवाल्या— २

उभ्या, नेत्र ताठोनि औत्सुक्यपूर्णा—
—कुणा सांगवे !—दृश्य त्या बालकांना !
कशा, येति केंव्हा, कुठे, त्या * जगाला
कळे आइवांचोनिया हें कुणाला ? ३

न जाणो ! प्रभावान् अशा त्या ऋषीला
वदे त्याहुनी जास्त ठावें मनाला
कधी आइ ती कोणत्या आत्मयाला—
—कळे का—करी स्वीय सिंहासनाला ? ४

---

'Who knows how the Mother plays!' नामक कवितेचा अनुवाद

* त्या = घडामोडी

स्वतंत्राच जी, हो नियम्या कशी ती ?
जिची मुक्त स्वेच्छा व्यवस्था महा ती
अमोघा जिची पूर्ण इच्छा अशी ती
तिच्या तीव्र इच्छे दिशा कोण दावी ? ‡ ५

पित्याला कधी स्वप्नही ना जियेचें
अशी थोरवी येइ वांट्या मुलाचे
हजारो पटी पोटिंच्या पुत्रि-पोटीं
स्वतःशक्ति माता अता साठवी ती ६

•

❖ ❖ ❖

---

‡ हाच श्लोक निराळ्या रीतीने :—

(वृत्त-पृथ्वी)

स्वतंत्रचि असे स्वयें नियम कोण बांधी तिला ?
जिची लहर हो महत्तम अशी व्यवस्था, तिला—
अमोघ-नियमा जिची नित स्वकीय इच्छा, तिला—
गुणें कवण दाविणें जगतिं मार्ग जो चांगला ? ५

# शूर हृदया ! धीर धर !

(वृत्त–मालिनी)

जरिहि जलद किंचित् सूर्यबिंबासि झाकी
जरिहि गगन सारें हें उदासीन हो की
तरि धरि हृदया हे ! वीर ! थोडाचि धीर !
विजय तुजसि अंतीं खास आहे समोर ! १

शिशिर न कधि ऐसा ये न पश्चात् वसंत
करित जलिं तरंगीं पोकळी शीर्षि मात
ढकलिति किरणीं की एकमेकां तमांत
म्हणुनि अढळ राहीं वीरवृत्तिप्रशान्त २

कठिण अति स्वकर्मा जागणें ! सौख्य येथे—
क्षणचि टिकत ! खोटें ! ध्येय अस्पष्ट, होतें—
पुसट ! तरिहि रेटी तूं तमीं शूर जीवा !
स्वबल सकल आता ह्या इथे पूर्ण लावा ३

नच कधि श्रम किंवा कामही व्यर्थ जातें
फसत जरिहि आशा, शक्ति ही क्षीण होते
तुजसि तनय जन्मे; धीर थोडा धरी रे
नच कधि, अयि वीरा ! चांगलें नष्ट होतें ४

---

राजपुतान्यांतील खेत्रीच्या राजेसाहेबांना लिहून पाठविलेल्या 'Hold on yet a while, Brave Heart' या कवितेचा अनुवाद

जगतिं बहुत थोडे रे भले वा शहाणे
परि असत तयांच्या हातिं सूत्रें वहाणें
नित कळत तयांची योग्यता रे उशीरा
मुळि न बघत कोणा शान्तसा जाइं वीरा ! ५

तुजसव असती रे सर्व जे दूरदर्शी
तुजसव अयि, आहे ईश तो सर्वशक्ती !
तुजसि सकल आशीः थोर जीवा ! मिळो दे
तुजसि उचित तें तें सर्व कांही घडो दे ! ६

# आशीर्वाद

(वृत्त-गीति)

मातेचें तव हृदयहि, निश्चयशक्ती तशीच वीराची ।
माधुर्या तव येवो गोडी मलयाकडील वायूची ।। १

आर्यांच्या वेदिवरीं मुक्तपणें नांदतें झळाळत जें ।
शुचितम सौंदर्यहि वा सामर्थ्यहि तें असोचि सर्व तुझें ।। २

आणीकहि बहु लाभो तुजसी भगिनी निवेदिते शिष्ये ! ।
जें प्राचीनांसी न पूर्वी स्वप्नींही कल्पितां मुळी कधि ये ।। ३

येईल भारताची संतति जी ह्या भविष्य काळांत ।
तिज शिक्षिका, सुहृत्, हो सेवकही, सर्व तूंच एकांत ।। ४

* * *

२१ सप्टेंबर १९०० रोजीं भगिनी निवेदितांना लिहून पाठविलेल्या 'A Benediction' कवितेचा अनुवाद

# नाही बोल कुणासही

(वृत्त--शार्दूलविक्रीडित)

अस्ता जात रवी; तदीय किरणें आरक्तता येतसे—
लोपे जो दिन त्याप्रती; दचकुनी मागे जई मी बघे
लज्जाकारण वाटती जय अता जे आज संपादिले
आहे दोष मदीय; नाहि दुसरा कोणीहि दोषी इथे ॥१॥

माझें मी घडवी तसें बिघडवी हें रोज हो जीवन
प्रत्येका कृतिने समान निपजे; निर्मी भलें सद्गुण
निर्मी दुष्टहि दुष्ट; ना कुणि कधी हा ओघ रोधूं शके
आहे दोष मदीय; नाहि दुसरा कोणीहि दोषी इथे ॥२॥

आहे मूर्तिच मी स्वकीय कृतिची त्या भूतकालांतिल
झालें योजन हें तदाच; जुळते इच्छा, विचारांतिल—
सारें त्या जुळतेंचि; बाह्य मम ही कायाहि त्याला जुळे
आहे दोष मदीय; नाहि दुसरा कोणीहि दोषी इथे ॥३॥

येतें प्रेम म्हणोनि प्रेम फिरुनी होतां परावर्तित
द्वेषें जन्मत द्वेष जास्त कडवा; जें योग्य तें लाभत
जन्मीं वा मरणींहि हक्क निज ते माझ्यावरी सांगती !
आहे दोष मदीय; नाहि दुसरा दोषी कुणी ह्यामधी ॥४॥

---

न्यू यॉर्क येथून १६ मे १८९५ रोजीं लिहून पाठविलेल्या 'No one to blame' या कवितेचा अनुवाद

श्चात्तापहि व्यर्थ, भीतिहि तशी आहेच मीं सांडिली
कर्मांचा कळला प्रभाव मजला माझ्या; भुतें निर्मिली--
कर्माने मम, तोंड देत सुख-दुःखा-कीर्ति-निंदेप्रती
आहे दोष मदीय; नाहि दुसरा दोषी कुणी ह्यामधी ॥५॥

प्रेम-द्वेष, भलें-बुरें, सुख तसें की दुःख, हे नित्यसे
अन्योन्यां धरुनीच राहति, परी मी स्वप्न पाहें असें--
'दुःखावांचुनि सौख्य !' हाय, कधिही आलें न--आलें न तें !
आहे दोष मदीय; नाहि दुसरा कोणीहि दोषी इथे ॥६॥

सोडी द्वेषहि, प्रेमही, मम सरे तृष्णा अता जीवनीं
आता शाश्वत मृत्यु केवळ मला मी मागतों संपुनी
आत्मज्योति मदीय जाउनि मिळो निर्वाणमोक्षामधे
द्यावा दोष कुणासि ? शिल्लक तिथे कोणीच ना राहतें ! ॥७॥

(वृत्त--मदिरा)

मानव एक, प्रभू जगिं एकचि, पूर्णहि नित्यचि एकचि आत्मा
एकचि तो "ऋषि" नित्यचि तुच्छ करीं कुटिलांपरि कृष्णहि मार्गा
एकचि तो नर धाष्टर्य जयासि विवेक करोनिहि दावित ध्येय--
'शापचि मृत्युहि, शापचि जीवन, उत्तम तो मिटवी असणेंच' ॥८॥

॥ ॐ नमो भगवते सम्बुद्धाय ॥
॥ ॐ भगवान् सम्बुद्धाला नमस्कार असो ॥

❖ ❖ ❖

# स्वतःच्या जीवास

(वृत्त—अनुष्टुप्)

हृदा रे काळिजा माझ्या ! कांही काळचि आणिक——
धरी रे धीर ! ना फोडी जोडी जी आपुली असे—— ॥१॥
जन्माची जाहली,——आता जरी अंधुक हा दिसे——
वर्तमान, दिसें तैसें भविष्यहि उदाससें ॥२॥
गमे एक युगाची ती कथा ! जैं डोंगरावरी——
दरीमाजि प्रवासाला निघालों तूं नि मी सवें ॥३॥
शान्तशी चालली नौका शान्त होता समुद्र जैं
परी तो फार थोडाच सापडे शान्तसा कधी ॥४॥
स्वतां माझ्याहुनीही तूं कितीदा जवळीं मला !
मनोर्मि उद्भवापूर्वी सांगसी स्पष्ट त्या मला ! ॥५॥
कितीही सूक्ष्म राहोत मद्विचार, स्वरां तयां——
अती पूर्ण, खरा, ऐसा प्रत्यावर्तक होसि गा—— ॥६॥
असेचि नाडिचे ठोके जुळले पूर्ण आपुले
अता का, चित्रगुप्ता रे ! सांग, जोडी फुटायची ? ॥७॥
मित्रभाव तुझ्याठायीं तशी विश्वासुता असे
कां की, घोळति जेंव्हा रे दुर्विचार मनामधे—— ॥८॥
सावधानपणाची तूं सूचना निश्चयें दिली
आणि, हाय, जरी मी ती सूचना झिडकारिली—— ॥९॥
तरी नित्यापरी तूझा सारखा क्रम चालला
चांगला राहिला नित्य, सत्यही नित्य राहिला ॥१०॥

❖ ❖ ❖

---

'To my own Soul' नामक कवितेचा अनुवाद

# शान्ति

(वृत्त–भुजंगप्रयात)

पहा ! येत ती शान्ति सामर्थ्ययुक्ता
असे शक्ति जी, शक्ति नाही, पहातां !
असे अंधकारामधे जो प्रकाश
प्रकाशीं असे उज्ज्वलीं जो तमोंश १

असे हर्ष हा जो कधी बोलला ना
न जें वाटलें तीव्र तें दुःख जाणा
अमर्त्यत्व हें जें अभुक्तस्थितींत
नसे दुःख ज्याचें असा मृत्यु नित्य २

नसे सौख्य तें, तेवि तें दुःख नाही
परंतु मधे जें तयांच्याचि राही
नसे रात्र ती, की नसे तो "उद्या"-ही
तयांचा करी संधि ती तीच पाहीं ३

असे गोड विश्रान्ति संगीतिं तीच
पवित्रा कलेमाजि विश्राम तीच
असे स्तब्धता भाषणांच्या मधे ती
प्रकोपांत दो, शान्तता काळिजाची ४

---

न्यू यॉर्कमधील 'रिज्ले मॅनॉर' येथे इ. स. १८९९ सालीं रचलेल्या 'Peace' कवितेचा अनुवाद

कधी ना दिसे तेंचि सौंदर्य तें गा
उभें राहि एकाकि तें प्रेम तें गा
न गातांहि आहेचि जें गान तें गा
कधीहि न जें जाणलें ज्ञान तें गा ५

असे दोन जन्मांमधे मृत्यु तीच
मधे वादळांच्या असे शान्ति तीच
जिथोनी निघे सृष्टि तें शून्य तीच
फिरोनी जिथे जाइ तें स्थान तीच ६

गळे अश्रु तो तो तियेमाजि जातो
स्मितातें जगीं विस्तराया असे तो
असे ध्येय हें जीवनाचें, अखेर
अहा ! शान्तिही ! गेह त्या एकमात्र ! ७

# निर्वाणषट्क

(वृत्त—गीति)

नाहीं मी मन, बुद्धी, नाहीं अहंकार, वा मनोद्रव्य
नाहीं देहहि, बदलहि जे देहामाजिं नित्य संभाव्य १
नाहीं मी श्रवणेन्द्रिय, रुचिचें, की घ्राण, दृष्टिचें किंवा
आकाशहि नाहीं मी, पृथ्वी, अग्नी, तसाचि मारुत वा २
सत्तास्वरूप केवल, केवल मी ज्ञान, केवलानंद !
शिव मी, शिव मी, शिव मी, शिव मी आहें सदाचि सुखकंद ! ३

नाहीं मी प्राणहि की पांची जे प्राणवायु ते नाहीं
नाहीं काया द्रव्यहि, किंवा मी पंचकोशही नाहीं ४
कर्मेन्द्रियेंहिं नाहीं, इंद्रियगोचर पदार्थही नाहीं
सत्तास्वरूप केवल, केवल मी ज्ञान, आत्मसुख तेंवी ! ५

"अस्मि शिवोहं !" शिव मी !!–आसक्ती ना मला तिरस्कार
लोभहि नाही, मोह न, नाही मला द्वेष की अहंकार ६
नाही धर्म, न मोक्षहि, इच्छा किंवा न वासनाविषय
सत्तास्वरूप केवल, केवल मी ज्ञान, आत्मसुखनिचय ! ७

---

श्रीशंकराचार्यांच्या " निर्वाणषट्क " ह्या स्तोत्राचा स्वामी विवेकानंदांनी इंग्रजींत 'Six stanzas on Nirvana' ह्या नावांने एक कवितावद्ध स्वैर अनुवाद केला आहे, त्या त्यांच्या इंग्रजी अनुवादाचा हा मराठी अनुवाद आहे.

"अस्मि शिवोहं!" शिव मी !!—पाप न सद्गुण, न सौख्य दुःख उत
नाहीं मंदिर, पूजा, यात्रा किंवा न पूज्य मी ग्रंथ ८
भोगक्रियाहि नाहीं, नाहीं मी भोग्य, नाहिं भोक्ताही
सत्तास्वरूप केवल, केवल मी ज्ञान, आत्मसुख तेवी ! ९

"अस्मि शिवोहं !" शिव मी !!–मृत्यु न, भय मृत्युचें मला नाही
नाही जाति, न जन्मा आलों कधिही, पिता न माताही १०
मित्रहि नव्हते, आप्तहि; गुरु नच मजला न शिष्य कोणीही
सत्तास्वरूप केवल, केवल मी ज्ञान, आत्मसुख तेवी ! ११

"अस्मि शिवोहं !" शिव मी !!–मज नच स्पर्शासि इंद्रियें केलें
नाहीं मी "मुक्ती" की "ज्ञेय"-हि; रूपासि नाहि मीं धरिलें १२
नाही मज सीमाही, स्थल-कालांच्या पलीकडे आहें !
सर्वां वस्तुमधे मी; विश्वाआधार; सर्व स्थलिं आहें ! १३
सत्तास्वरूप केवल, केवल मी ज्ञान, केवलानंद !
शिव मी, शिव मी, शिव मी, शिव मी आहें सदाचि सुखकंद ! १४

❖ ❖ ❖

# सृष्ट्युत्पत्तीचें स्तात्रे

**(जाति—चंद्रकान्त)**

अस्तित्व न, नास्तित्वहि नव्हतें, नव्हतें जग हेंही
आकाशहि वा पलिकडलें जें, नव्हतें हो तेंही
धुकें झाकिलें तदा कशाने ? कवणाचें हो तें ?
गहन तमामधि खोल असें तें काय तदा होतें ? १

मृत्युहि नव्हता, अमरत्वहि ना; भेद तदा नव्हता—
दिनरात्रीमधि; "तत्" तर्यि होतें स्पंदनमय स्थिरता
एकाकी तें ! आत्मवैभवीं लीन ! असें होतें
"तत्"—सोडुनिया कांहिहि तेव्हा अस्तित्वीं नव्हतें २

तमामधे तम लपुनी पडला होता प्रारंभीं
भेदहीन जणु एक-जल असे विशाल तो जलधी
लपुनी पडल्या, शून्यामधल्या, तैं "तत्"-तत्त्वाने
तपोबलाने एक दिव्यता निर्मियली जाणे

प्रथम उदेली 'इच्छा', पहिलें बीज मनाचें जी
(सर्व, ऋषींनी, असे जाणिलें हें हृदयामाजी
अस्तित्वाला नास्तित्वाहुनि त्यांनी निवडीलें)
किरण तियेचे पसरति वरती, बाजूतें, खालें

93863

"नासदीय सूक्त" (ऋग्वेद, मंडल १०, सूक्त १२९वें) ह्याचा स्वामी विवेकानंदांनी 'The Hymn of Creation' ह्या नांवाने इंग्रजींत स्वैर अनुवाद केलेला आहे; त्या त्यांच्या इंग्रजी अनुवादाचा हा मराठी अनुवाद आहे.



५५२०५ दि: ...

तीच दिव्यता त्याउपरी मग सृजनशील झाली
स्वधारणाकर तीतें तेव्हा तत्त्व असे खालीं
आणि तियेच्या वरती तेव्हा असती हो झाली
निर्मितिशक्ती, निर्मितिशक्ती, निर्मिति-बलशाली ५

मार्ग कुणाला माहित होता ? कोण तिथे वदलें ?
कोठुनि हें उत्पन्न जाहलें ? कोठुनि उद्भवलें ?
कारण, हें उद्भवल्याउपरी देवजाति झाली
ह्यास्तव निश्चित कोणि जाणिलें कुठुनि सृष्टि आली ? ६

कोठुनि उद्भव असे उपजला ? धरिला हा आहे ?
किंवा नाही ? परमव्योमाध्यक्ष जाणतो हें
हे शर्मन् ! हें तोचि जाणतो एक, असें आहे
काय नेम परि ! संभवतें की ज्ञात तया नोहे ! ७

❖ ❖ ❖

# विभाग दुसरा

(मूळ बंगाली)

# मित्राप्रत

(चाल—फटका)

अंधारामधि प्रकाश-अनुभव ! सुख दुःखामधि ! आरोग्य—।
रोगामधि ! की रडणें शिशुचें जितेपणाला हो साक्ष ! ॥

तिथे सुखाची आशा करिसी मतिमन्ता रे ? युद्ध जिथे—।
असे चाललें अविरत; दे ना स्थान पिताही पुत्रातें ! ॥

एक ओरडा "स्वार्थ", "स्वार्थ" हा ! इथे शान्तिचें रूप कुठे ? ।
नरकचि भासे स्वर्गचि साक्षात् ! सोडुं शके संसारातें—॥

कोण ? कर्म हा पाश बांधिला गळ्यासि, बोला जाणार—।
क्रीतदास हा कुठे ? पाहिलें सर्व मर्म मीं साचार ॥

योग-भोग, गार्हस्थ्य-संन्यसन, जप-तप, धन की मेळविणें ।
व्रतहि, त्याग, की कठिण तपस्या, सुख नच लेशहि, ओळखिलें—॥

मीं तों, ह्यामधि; विटंबना ही शरीर धारण हें करणें ।
हृदयवान निःस्वार्थ प्रेमिका ! एक गोष्ट निश्चित जाणे ॥

जितुकें जितुकें उच्च हृदय तव तितुकें दुःख तुला येथ ! ।
ह्या जगतामधि स्थान नाहि तुज ! लोह सहन करि आघात—॥

संगमरवरी कसा मूर्तिला सहन, सांग रे, तो होई ? ।
होई जडसम, नीच अतीही, मधुमुख, गरलान्तर होई ॥

सत्यहीन बन स्वार्थपरायण, तदा तुला ह्या जगिं स्थान ! ।
प्राणपणें मीं विद्या मिळविली, अर्धें गेलें हें जीवन—॥

---

'सखार प्रति' या कवितेचा अनुवाद

प्रेमपागलापरो ! धरियल्या प्राणहीन रे मीं छाया ! ।
धर्मास्तव घे किती मतें मी ! गंगातटिंही निवसाया—॥

गेलों, मसणीं वसलों, सरितातीरीं कीं पर्वतदरिंत ।
भिक्षा मागुनि पोट भरीलें असा काळही किति जात ! ॥

असहाय स्थिति ! चंद्रमौळि कुटि ! वणवण मी दारोदारीं—।
पोट जाळण्या फिरलों ! देहहि खंगत उग्र तपाचारीं ! ॥

काय ह्यांत मी "धन" मिळवीलें ? ऐक सांगतों मर्म तुला ।
सकल जीवनीं सार सत्य तें हेंचि कळालें रे मजला ॥

तरंगपीडित घोर भवाब्धिंत तारित ती एकचि नाव—।
—मंत्रतंत्र, प्राणांचें नियमन, मतामतें, दर्शन, वाव ! ॥

विज्ञानहि तें नांव ! भोग की त्याग—बुद्धिचे भ्रम सारे ! ।
"प्रेम !" "प्रेम !" तें एकमात्र "धन"!! जीव, ब्रह्म, मानव बा रे—॥

ईश्वर, भूत, तसे मृत, देवहि, पक्षि, पशू, कीटक सारे—।
—सर्वांच्या हृदयांत प्रेम हें ! 'देव' 'देव' दुसरा का रे ? ॥

कोण चालवी विश्व सर्व हें ? जीव, सुतास्तव, माता दे ।
चोरहि चोरी करी ! सर्व हें प्रेमाने प्रेरित असतें ॥

होउनि वाणी-मना अगोचर सुख-दुःखांत अधिष्ठित तें ।
महाशक्ति मरणात्मक काली ! जननी होउनि तें येतें ! ॥

रोग, शोक, दारिद्र्य-यातना, धर्माधर्म, शुभाशुभ तें—।
फल वा, साऱ्या रूपीं पूजा त्याचिच ही ! करितां येतें—॥

स्वतंत्रतेने काय जिवाला ? सुख मागी तो वेडा रे ।
दुःख मागतो तोही भ्रान्तचि ! मृत्यु मागि तो पागल रे ! ॥

अमरत्वाची वृथाचि वांछा ! दूर दूर जितुकें जावें—।
बुद्धिरथावरि बसुनी, जलधी संसाराचा हा गावे*—॥

तोचि हा, असा; सुखदुःखांमधि आवर्तन हा घेताहे ।
पंखहीन पांखरा ऐक रे ! पळण्याची ही वाट नव्हे ॥

अद्दल घडली पुन्हा पुन्हा तुज ! वृथाचि श्रम हे कां करिसी ?।
त्यजि रे विद्या-यज्ञ-जप-बलां, स्वार्थहीन प्रेमचि तुजसी—॥

एक खरें पाथेय असे; बघ, पतंग तुजला शिकवीतो ।
अग्निशिखेला आलिंगन दे ! रूपमुग्ध अंधचि होतो ! ॥

परी कीटका! प्रेममत्त तव हृदय असे! हे प्रेमिक रे !।
स्वार्थमलिनता अग्निकुंडिं तव टाक तशी तूं सारी रे ॥

भीक मागि त्या, सांग, सुख कधी मिळतें ? घेउनि उपकारा—।
तरी काय फल ! दे परि मागुं नको तूं कांही माघारा—॥

जरि ती श्रीमंती तव हृदयीं ! † तूं अधिकारि अनन्ताचा ।
प्रेमसिंधु हृदयान्तरिं आहे विद्यमान तव नित्याचा ॥

"दे","दे", म्हणतो ! परत मागतो ! प्रेमसिंधु आटुनि त्याचा—।
बिंदु बने रे ! ब्रह्मापासुनि कीटक, अणुही शेवटचा—॥

भूतमात्रही प्रेममय तसें, पायीं ह्यांच्या सर्वांच्या ।
देह, प्राण, मन, अर्पण करि रे पूर्णपणें मित्रा माझ्या ! ॥

अनंत रूपें उभा समोरचि ! सोडुनि धुंडिसि देव कुठे ?।
प्रेम करीं जीवांवरि त्यासचि ईश्वरसेवा घडताहे ॥

* गावे=सापडतो

† अथवाः—जरि तें प्रेम असे तव हृदयीं !

# तुला ऐकवायासि मी गीत गातों

(वृत्त—भुजंगप्रयात)

तुला ऐकवायासि मी गीत गातों ।
भलें वा बुरें मी न कांही गणीतों ॥
न वा लोक-निंदा-स्तुती मोजितों मी ।
तुम्हां दो जणांचा असे दास हा मी ॥१॥

सशक्तीक ऐशा तुझे पाय वंदीं ।
उभा पाठिमागेच आहेस तूं की ॥
वळोनी म्हणोनी स्मिता न्याहळीं मी ।
न भीं मी कुणाला; फिरे गात हा मी ॥२॥

पदांच्या तळीं, जन्म-मृत्यू, मदीय ! ।
दयासागरा ! दास मी तों त्वदीय—॥
किती जन्मिचा ! त्वद्गती ना कळे रे ।
मदीया गती ? तीहि ना आकळे रे ॥३॥

असे जाणण्याचीहि इच्छा कुणाला ? ।
असे भुक्ति, मुक्ती, तशी भक्ति, हीला—॥
——अशा सर्वही भावनांना,—जपाला ।
तपाला, भजावें तुला मानवाने, तयाला—॥४॥

---

'गाइ गीत शुनाते तोमाय' या कवितेचा अनुवाद

—तुझी होत आज्ञा,—दिलें हाकलोनी ! ।
परी एक ही राहिलीसे शिराणी ॥
तुला जाणण्याची ! प्रभू ! तीहि आतां ।
करी पार रे, अन्य सारेंहि जातां ॥५॥

जगत् सर्व हें चक्षु माझे पहाती ।
स्वताला न ते पाहण्या इच्छिताती ॥
पहावें तरी कां ? मुखातें दुजाच्या—।
पहातां पहाती स्वरूपा स्वताच्या ! ॥६॥

अगा ! तूंचि आहेस हे नेत्र माझे ।
तुझें रूप सर्वां घटीं; बालकाचे—॥
तुझ्या संगतीं मी करी पोरखेळ ! ।
करी क्रोध तूझ्यावरी कांहि वेळ ! ॥७॥

पळूं इच्छितों दूर तूंतें त्यजून !
उशाशी निशाकालिं वाणीविहीन—॥
उभा राहसी, नेत्र पाणावलेले—
तुझे, माझिया आननीं लागलेले ! ॥८॥

त्वरेने फिरे भाव; पायां धरीतों ।
परी मी क्षमायाचना ना करीतों ॥
तुला रोष येईच ना ! बाळ मी तों—॥
तुझा; कोण औद्धत्य साहे दुजा तो ? ॥९॥

प्रभू तूं, सखा जीविंचा तेंवि माझा ! ।
कधी देखतों, तूंच मी; मीच तूं गा ! ॥
अगा ! वाणि तूं—शारदा कंठिं माझ्या ! ।
तरंगांमधे वाहती लोक तूझ्या ! ॥१०॥

महासिंधु गर्जेचि हुंकार तूझा ।
शशी-सूर्य हा बोलही त्वद्वचाचा ॥
मृदू मंद वायूहि आलाप तूझा ।
असे सत्य ही सर्वही मान्य वाचा ॥११॥

परी वाटतो फार हा स्थूल भाव ।
न बोलेल तत्त्वज्ञ ऐसाचि वाव* ॥
शशी, सूर्य, तारे, ग्रहादी चलांतें—।
—निवासी किती कोटि!—त्या मंडळींतें—॥१२॥

तसा धूमकेतू, तडित् जी लकाके ।
नभोऽनंतविस्तार हें चित्त देखें ॥
स्मर-क्रोधही लोभही मोह आदि ।
तरंगें जया सृष्टिलीला बने ही—॥१३॥

अविद्येसि विद्येसि जो गेह होई ।
जरा, जन्म, मृत्यू, तसा जीवनींहि—॥
सुखें, दुःखयोगें, भरे द्वंद्व मोहे ।
"अहम्"—हा"अहम्" केंद्र ज्यालागि
आहे—॥१४॥

* वाव=व्यर्थ, 'भाव'-कडे संबंध

भुजा दोन त्या "आंत" "बाहेर", ऐशा ।
शशी-सूर्य-तारान्त अब्ध्यन्त, तैशा ॥
तसें सर्व आकाश आहे अनन्त ।
मनोबुद्धयहंकार चित्तादि त्यांत--॥१५॥

तसे देव-दैत्यादि यक्षादि हेही--।
नरासंगतीं, पक्षि प्राणी, कृमीही ॥
द्व्यणूचे परी येथ एकाणु राहे ।
जडा सर्व जीवांसि आधार आहे ॥१६॥

तिथे ह्या समक्षेत्रि हे राहतात ।
अती स्थूल हा बाह्य सारा विकास ॥
जसे मस्तकीं केश तैसा असे हा ।
तटीं मेरुच्या त्या हिमाद्री अहाहा ! ॥१७॥

किती योजनें भव्य ! उतुंग शृंगें ।
निरभ्रीं नभीं शेकडो जाति वेगें ॥
झळाळे, जळे का, हिमाची शिला ही ।
झुती फेकिली काय विद्युत्-शतांहीं ॥१८॥

विवस्वान् अता उत्तरेला निघाला ।
अता एकता दे अनंतां करांला ॥
किती कोटि वज्रांपरी रश्मिधारा ।
यदा ओतितो पर्वतांच्या शरीरा--॥१९॥

तदा शृंगशृंगावरी भासताहे ।
जणो सूर्य मूर्च्छेमधे लोळताहे ! ॥
द्रवे शृंग, माथा, गिरीही, कपारी ।
गिरी कोसळे तो करी शब्द मारी ॥२०॥

जसें स्वप्न स्वप्नामधे लीन होय ।
तसें वारि वारी तदा एक होय ॥
कृपेने तुझ्या एकभूता यदा त्या ।
समस्ताहि वृत्ती मनाच्या मदीया—॥२१॥

तदा कोटि सूर्याहुनिही प्रकाश ! ।
तदा चिद्रवीचा घडे हो विकास ॥
गळोनी तदा जाति हे सूर्य-तारे ।
तसा चंद्र, आकाश, पाताळ सारे ॥२२॥

गमे सर्व ब्रह्माण्ड तेव्हा लहान ।
जणो एकल्या गोष्पदाच्या समान ! ॥
असे ब्राह्मभूमी-अतीता गती ही ।
इथे शान्त धातू, मना स्पंद नाही ! ॥२३॥

श्लथा सर्वही काळिजाच्याहि तारा ।
तुटे सर्वही बंधनांचा पसारा ॥
सरे दूर माया ! अनाहत् निनादे—।
तिथे गर्जुनी ! वाणि आहे तुझी हे ॥२४॥

तुझा दास अल्यादरें ऐकतो हा ।
सदा सिद्ध कार्यासि आहे तुझ्या हा ॥
" 'अहम्' हा असे ! सृष्टिच्या अंतकाळीं ।
अनन्ताहि ब्रह्माण्डगोलांसि खाई—॥२५॥

"—यदा नाश; ज्ञाता नसे ज्ञान, ज्ञेय ।
अचिन्हा, अतर्क्या, अशी सृष्टि होय ॥
शशी-सूर्य-तारां नसे तेथ थारा ।
महाघोर निर्वाण तो हाचि सारा ॥२६॥

"तसें साधना, कर्म की कारणाला ।
इथे स्थान कोठे नसे राहण्याला ॥
फिरे येथ अंधारिं अंधार घोर ।
परी 'मी' असे येथही तो अखेर ! ॥२७॥

"फिरे येथ अंधारिं अंधार घोर ! ।
गुणां-भेद-सृष्टींसि शान्ती अपार ॥
असे शुद्ध तें सूक्ष्म एकाणुकाय ।
तिथेही परी अन्ति हा 'मी'च होय ॥२८॥

"पुन्हा मी जगीं ह्या विकासस्वरूप ।
मदीयाचि शक्ती सुरूचा विकार ॥
तशी आदिवाणीहि ओंकाररूपा ।
महाशून्य मार्गीं जिची गर्जना गा ॥२९॥

"महानाद आकाश ऐके अनंत ।
त्यजी झोप तो कारणांचा कदंब ॥
अनंता अणूंना नवा प्राण आला ।
महावर्ति उच्छ्वास नाचूं निघाला ! ॥३०॥

"दुरूनी, अती लांबुनी, चाल घेतो ।
मधे, मध्यकेंद्रासि तो श्वास जातो ॥
तदा निर्मि चैतन्यवायू खलीला ।
महाभूतसिंधूवरी ऊर्मिमाला ॥३१॥

"अणू, तेथ आवर्त तेथे विकास ।
गती, पात, उच्छ्वास हेही भरीस ॥
महावेगिं धावे सदा वीचिराजी— ।
अणूंची, अनंता अनंता विभागीं ॥३२॥*

"वळोनी यदा येत आघात तेव्हा ।
बळें त्याचिया फेकिले जाति ते वा—॥
वरीं; तेधवा धावती शून्य मार्गीं ।
'खगोलांतले गोल' ये रूप त्यांसी ॥३३॥

---

* मूळ वर भाषान्तर केल्याप्रमाणे आहे. पण अर्थविशदीकरणार्थ त्याचें भाषान्तर पुढीलप्रमाणेहि करतां येईल:—

"अणू घेत आवर्त घेतो विकास । गती, पात, उच्छ्वास, हेही तयास ॥
महावेगिं धावे तदा वीचिराजी । तयांची, अनंता अनंता विभागीं ॥३२॥

"ग्रहांच्या सवें तारका धावतात ।
फिरे पृथ्वि जेथे मनुष्या निवास ॥
कवी आद्य 'मी' ! शक्तिचा हा विकास—।
मदीया, रची सर्व जीवां जडांस ॥२४॥

"महाशक्तिरूपा मदीयाचि माया ।
तिच्या संगतीं खेळतों खेळ मी हा ॥
असे एकला ! एकल्यातें मलाच ।
अनेकां स्वरूपीं स्वतां पाहण्यास ॥२५॥

"कवी आद्य 'मी' ! शक्तिचा हा विकास—।
मदीया, रची सर्व जीवां जडांस ॥
ममाज्ञाबलें येथ झंझा वहात ।
तसा गर्जतो मेघ विद्युन्निनाद ॥२६॥

"मृदू मंद वायू तसा दक्षिणेचा ।
धरी रूप प्रश्वास-निःश्वास साचा ॥
सदा जाइ येई; तशा रश्मिधारा ।
हिमांच्या शशी ओतिताहे भरारा ॥२७॥

"तरू-वल्लरींनीच आच्छादिलेली—।
धरेची वपू; की मुखें मार्जिलेलीं—॥
दवाने जयांचीं फुलें फुल्ल ऐसीं ।
रवीच्या दिशे मान उंचावतातीं" ॥२८॥

❖ ❖ ❖



५

# कालि करो मग नृत्य तिथे !

(वृत्त--मदिरा)

फुल्ल फुलें अति सौरभ-आकुल, गुंजति भृंग मदें भवतालीं ।
शुभ्र शशी स्मितराशिच स्वर्गिंहुनी जणु देवचि आणिति खालीं ॥
मंद मृदू मलयानिल लागुनि दूर करी पट आठवर्णांचा ।
रम्य नदीनद, ऊर्मि सरांतिल, चंचल भृंग, किती कमलांच्या–॥१॥
डोलति ह्या तति; निर्झरिणी झरती किति फेनिल, मंजुल गात ।
खोल गुहेंत प्रतिध्वनि गुंगत; पक्षिसमूह बने जणु तेथ—॥
केवळ की स्वररूप, लपोनि लतांत तिथे प्रणयार्द्रचि गाती ।
चित्रकरात्मक नूतन भास्कर स्वर्णतुलींतुनि सर्व धरित्री—॥२॥
चित्रपटापरि रंगवितो; धरणीवरि खेळति हे किति रंग ।
रंग बघोनि मनीं उसळोनि किती खुलती तयिं भावतरंग ! ॥

गर्जति मंद्र गभीर असे घन ! चालतसें रण स्वर्गधरेतें—-।
व्यापुनिया; तम ओकतसे अधिकाधिक कृष्ण अशाचि तमातें ॥३॥
हुंकृति सोडि प्रभंजन तो प्रलयोत्सुक; दामिनि ज्वाल-कराल—-॥
रक्तशरीर लकाकत राहुनि राहुनि साह्य तयास करीत ॥
फेनिल सागर चंडशरीर अती गरजे ! वरि फेकित लाटा ।
पर्वतचूडहि ज्या करण्यास्तव लंघन धावति वेगवती त्या ॥४॥
घोष भयानक घोर गभीर निनादित भूतल; कांपत पृथ्वी—।
जाय रसातळिं ! अग्नि उफाळत भूतलदाहक ! पर्वतराजी—॥
शीघ्रचि चूर्णित होय !!

---

'नाचुक ताहाते श्यामा' या कवितेचा अनुवाद

सुशोभित मंदिर आलय; वारिहि नील—।
रम्य सरोवरिं; त्यांत कितीतरि नील-सरोज-ततीहि विलोल ॥५॥
द्राक्षफलांतिल शोणित,* जें वरि फेनिलसें, करितें हळु शब्द ।
कर्णपथावरि तंत्रिमृदुस्वन जागवि भाव किती हृदयांत—॥
रागवलें, उत ताळवलें, लय साधुनिया; व्रजमंडल सारें—।
केवि उचंबळतें ! व्रजनारि किती त्यजिती अति उष्ण उसासे ॥६॥
अश्रु अपारहि वाहति ! बिंबफलापरि ओष्ठ अहो युवतींचे ।
सागर भावजलें भरले मृदु नील सरोजचि लोचन त्यांचे ॥
बाहु जणों सरसावति उत्सुकसे ! अयि ! पंजर प्रेमजगीं हे ।
कोंडुनि त्यांमधि जीव-विहंगम बंधनिं त्या पडुनी नित राहे ॥७॥

भेरि निनादत ! दुंदुभि गर्जत ! कापतसे धरणी चरणाने—।
आपटतो जयिं वीर; धडाडत तोफ शतघ्निहि चंड रवाने ॥
धूम्रवळें रणभूमि भयानक ! गर्जत ओकत आग मुखाने—।
ज्वालमुखीशत जेंवि उफाळत आज इथे रणभूमिमिषाने ॥८॥
गोलक ते फुटती; फुटतीं हृदयें; शरिरावरि लागति घाव ।
स्वारसमेत कुठे उडती वरि अश्व तसे गजराज अजीव ॥
कांपत भूतल ! लक्ष वराश्व सवीर रणांमधि धूम करीती ।
भेदुनि धूम्रहि गोलकवर्षण, गोळिहि, शत्रुशतघ्नि हरीती ॥९॥
शौर्यनिदर्शक चालति हे ध्वजदंड कितीक बिनीवरती ।
शोणितधार तयांतुनिया टपके ! संव चालति तेंवि पदाती ॥

---

* द्राक्षफलांतील रसापासून (शोणित) मद्य तयार होतें. तें पेल्यांत ओतलें म्हणजे त्याच्यावरती फेस येतो, आणि त्याचा हळूहळू आवाज होतो.

बंदुक धुंदचि शौर्यमदें प्रबला ! पडला रणिं तो ध्वजधारी——।
वीर, दुजा उचलोनि पुढे घुसतो कुणि वीर ध्वजा उडणारी ॥१०॥
पायतळीं खच हा पडला मृतवीरशरीर ! तरी न फिरे हा ! ।

मागत देह सुखास ! मनःखग मागत गानसुधारसमोहा ॥
दोल सुहास मनास गमे; नित लोलुप जीवहि दुःख तराया ।
सोडुनि शीत शशांक कुणास दुपार हवी जळती जिचि काया ! ॥११॥
चंड दिवाकर प्राण तया तरि शीत शशीच जगा प्रिय होतो * ।
सर्वचि व्यग्र सुखास्तव ! दुःखिंहि प्रेम करी कुणि पामर का तो ? ॥
दुःख सुखीं; विषही अमृतीं; उत कंठिं हलाहल ! ती तरि आशा——।
सोडि न ! रौद्र स्वरूपिं भिती ! नच मृत्युमया हवि कालि
कुणाला ! ॥१२॥

भीषण खड्ग जयांतुनि उष्ण वहात रहातचि शोणितधारा ।
दूर करोनि तिला करिं बासरि देति तुझ्या ! परि मृत्युशरीरा—॥
तूंच खरी ! वनमालि सुखी तव मायिक सावलिची पडछाया ! ।
भेदुनि मर्म, दया शरिरीं, सुख-वेड, करालि ! हरी तशि माया ॥१३॥
मुंडक-माळ गळां तव घालुनि भीतिमुळे पळती मग मागे ।
नांव "दयामयि" देति तुला मग ! कांपति गे तव भीषण हासे ! ॥
नग्न दिशावसने म्हणती मग "दानव जिंकितसे वव आई !" ‡ ।
"दर्शन घेउं तुझें" वदतीं मुखिं ! वेळ पडे तव ठावचि नाही ! ॥१४॥

---

* चंद्राचा प्राण सूर्य आहे. पण तरी सूर्याला सोडून सगळ्यांना चंद्रच बरा वाटतो. कोमल भाव सर्वांना इतका प्रिय असतो.

‡ केवळ 'सुखमय' भावाने मनुष्याची कापुरुपता कोठवर जाते तें येथे दाखविलें आहे. श्यामा-मातेची उपासना करण्यास जाऊन, तिच्या गळ्यांतील मुंडमाला पाहून "भयाने परत फिरतो (पळतो)" आणि तिला "दयामयी" हें नांव देतो. त्याचप्रमाणे कालीमातेला भीतीने "दानवजयी"

मृत्युचि तूं ! विषकुंभ भरोनिच वांटिसि रोगहि साथि जनांत ।
पागल रे ! ठकितोसि स्वतांसिच; पाहसि ना वळुनी; बघ तेथ--॥
भीतिकरा तुज तीच दिसेल ! सुखार्थ खपे तुज दुःखहि थोडें ॥
पूजन, भक्तिहि, सोंग वरी तरि अंतरिं स्वार्थचि सर्व पुरा रे ! ॥१५॥
छागलकंठिंहि शोणितधार बघोनि भरे भय, काळिज कांपे ! ।
कापुरुषा ! करुणामय तूं ? अति छानचि हें !! कथुं सत्य कुणातें ?* ॥
फोडुनि बीन, सुधामय प्रेम न पान करीं; अति उत्कट ओढ---।
नारिसि दूर करीं; पुढती चल; सिंधुपरी गरजो तव गान ! ॥१६॥
अश्रुजलाप्रति पान करीं; लढ प्राणपणें पडला जरि काय ।
जाग सुवीर ! विरो तव स्वप्न; शिरीं यम ! शोभत हें भय काय ? ॥
दुःख अपारचि ! शंकर ईश्वर ! मंदिर त्या शवभूमि चितांत ! ! ।
संगर घोर अपार, तयाप्रति शोभत पूजन हेंच जगांत ॥१७॥
येउं कितीहि पराजय, त्यास्तव भीति कधीहि धरूंच नको ।
चूर्ण करीं परि तूं हृदयान्तरिं स्वार्थहि, हौसहि ठेवुं नको ॥
मारुनि मानहि तूं हृदयान्तरिं निर्मि स्मशान समस्त भयाण ।
येउन कालि करो मग नृत्य तिथे स्थल योग्य स्वतांस बघून ॥१८॥

❖ ❖ ❖

---

म्हणतो. ह्या ठिकाणीं साधकाचे श्यामा-आईच्यावर प्रेम, प्रीति नाही; त्याऐवजी भय, कापुरुषता आहे. श्यामा मग "आई" नाही; तर ती 'दयामयी' आणि 'दानवजयी' आहे.

* बळी देतांना रक्त पाहून देह कांपतो. भय, खिन्नता इत्यादि हीं दुर्बलतेचीं लक्षणें आहेत. प्रेमाने मनुष्य निर्भय होतो. इकडे पाहावें तर स्वार्थसिद्धीच्या आशेने, कदाचित् कोणातरी माणसाचा सर्वस्वी नाश करण्याकरिताच, ही पूजा मांडलेली; पण तिकडे बकऱ्याच्या गळ्यांतून रक्त निघतांना पाहिल्याबरोबर मात्र भयाने कांपरें भरतें ! खरे शूर असतात तेच खरे दयावान् असणें शक्य आहे.

इथे दिसती हे प्रणयि जीव दोन
अंतिं आकाशीं सर्व हो विलीन !
खालिं सिंधू हा विविध तान घेतो
महासिंधू तव परि न भारता तो ! ४

जगीं आहे विख्यात तुझा सिंधू
रूपरागहि जलरूप येथ बंधू--
बनुनि गाती, परि नाहि गर्जना ते
तुझ्या सागरिं जी प्रत्ययास येते ५

❖ ❖ ❖

# प्रलय अथवा गाढ समाधि

(वृत्त--शार्दुलविक्रीडित)

नाही सूर्य, न ज्योति, तेवि शशिही सौंदर्यशाली तिथे ।
भासे विश्व चराचरासह नभीं छायेपरी चित्रसें ॥
सारें अस्फुटसें मनो-नभिं; जगत्संसार भासे असा ।
होई, भासत, हा बुडे पुनरपी "मी"-स्रोतिं हो नित्यसा ॥१॥

धीरे आणिक सावकाश शिरतें सद्धामिं छायादळ ।
वाहे मात्र "अहं" "अहं" सतत ही धारा तदा निस्तुल ॥
थांबे हाहि प्रवाह तैं मिळतसे शून्यामधे शून्य तें ।
नाही वाणिमनासि गोचर असें तें जाणती जाणते ॥२॥

❖ ❖ ❖

'प्रलय वा गभीर समाधि' या कवितेचा अनुवाद.

# सृष्टि

(वृत्त—विबुधप्रिया)

एकरूप, अरूप, नाम न, वर्णही न, न काल त्या
नाहि भूत, भविष्यही, स्थलही न, सर्वविहीनता
"नेति" "नेति" थके जिथे, तिथुनीच कारण-धार ही—
येत वाहत; वासनामय रूप उज्ज्वल घेत ती ॥१॥

तेंचि वारि रवा करी अति गर्जुनी नित—'मी असे !'
'मी असे !' नित 'मी असे'; नच वासनाब्धिस त्या असे—
पार; त्यांत अनंत अब्ज तरंग हे उठती किती—
रूप, शक्ति, गती, स्थिती, करि कोण त्यांप्रति हो मिति ? ॥२॥

कोटि चंद्र, रवी तसे, जनमोनिया जलधींत ह्या
नाद माजविती किती अति घोर आक्रमुनी नभा
दिव्य दीप्ति दहा दिशांप्रति धुंदहि करिते अति
त्यांत हे जड जीव दुःख-सुखांप्रति किति भोगिती ! ॥३॥

(वृत्त--अनुष्टुप्)

जन्मणें मरणें त्यातें जराही ग्रासिते तया
सूर्य तो, किरणें त्याचीं; सूर्य तो, किरणेंहि तो ॥४॥

❖ ❖ ❖

---

'सृष्टि' या कवितेचा अनुवाद

# समुद्रावर असतां

(वृत्त--दिंडी)

नील आकाशीं उडत मेघराशी
श्वेत, कृष्णहि हे किती रंग त्यांसी !
अधिक-कमती घन, हाचि भेद त्यांत
पीत भानूहि हा निरोप घेत १

रंग त्याचे हे दावितात मेघ
चंड्र वायू स्वच्छंदसा वहात
क्षणीं घडितो, क्षणिं मोडितो घनां तो
खऱ्या खोट्या किति आकृती करीतो २

जीव जड, किति वर्ण, रूप, भाव
एक घन जणु तूळराशि होय
अन्य क्षणिं तो दिसतोचि महासर्प
सिंह-विक्रमही इथे प्रकट होत ३

---

'सागर-वक्षे' या कवितेचा अनुवाद. दुसऱ्या खेपेस पाश्चात्त्य देशांतून परत येत असतां ही कविता स्वामीजींनी रचली. ह्या वेळीं बहुधा ते भूमध्य समुद्राच्या पूर्वभागांतून चाललेले होते.

इथे दिसती हे प्रणयि जीव दोन
अंतिं आकाशीं सर्व हो विलीन !
खालिं सिंधू हा विविध तान घेतो
महासिंधू तव परि न भारता तो ! ४

जगीं आहे विख्यात तुझा सिंधू
रूपरागहि जलरूप येथ बंधू—
बनुनि गाती, परि नाहि गर्जना ते
तुझ्या सागरिं जी प्रत्ययास येते ५

# शिव-संगीत — १

(चाल—फटका)

ताथेईया ताथेईया नाचत भोला श्रीशंकर ।
'बम् बब' वाजे गाणें; डिमि डिमि नाद करी डमरूचा स्वर ॥१॥

कपाल-माला गळां डोलती; जटेंत गंगाही गरजे ।
त्रिशूळ राजत, अग्निहि ओकत ! धक् धक् करितें बंधन जें—॥२॥

श्रीशिव अपुल्या जटेसि बांधिति; शशांकही तेथे आहे ।
त्या ज्वालेचा शेक शशांका भालदेशिं लागत आहे ॥३॥

❖ ❖ ❖

---

'शिव संगीत' नामक दोन कवितांचे अनुवाद.

# शिव-संगीत — २

(चाल—भूपाळी)

हर ! हर ! हर ! भूतनाथ ! हे पशुपति ! योगेश्वरा ! ।
हे पशुपति ! योगेश्वरा ! ।
महादेव ! शिव ! पिनाकपाणी ! जटाभार, वरि, हरा !—॥ १ ॥

तव जळताहे ! डोलतसे शिर नाचसि तैं शंकरा ! ।
नाचसि तैं शंकरा ! ।
सप्त-भुवन हें धरित ताल तैं; डळमळते ही धरा ! ॥ २ ॥

❖ ❖ ❖

# श्रीरामकृष्ण-आरात्रिक

खण्डन भव-बन्धन, जगवन्दन, वन्दि तोमाय ।
निरंजन, नररूपधर, निर्गुण गुणमय ॥१॥
मोचन-अघदूषण, जगभूषण चिद्घनकाय ।
ज्ञानांजन-विमल-नयन, वीक्षणे मोह जाय ॥२॥
भास्वर भाव-सागर चिर-उन्मद प्रेम-पाथार ।
भक्तार्जन-युगलचरण, तारण भव-पार ॥३॥
जृम्भित-युग-ईश्वर, जगदीश्वर योगसहाय ।
निरोधन, समाहित मन निरखि तव कृपाय ॥४॥
भंजन-दुःखगंजन, करुणाघन, कर्मकठोर ।
प्राणार्पण-जगत-तारण, कृन्तन-कलिडोर ॥५॥
वंचन-कामकांचन, अतिनिन्दित-इन्द्रिय-राग ।
त्यागीश्वर, हे नरवर, देहो पदे अनुराग ॥६॥
निर्भय, गतसंशय, दृढनिश्चयमानसवान ।
निष्कारण-भकत-शरण, त्यजि जाति-कुल-मान ॥७॥
सम्पद तव श्रीपद, भव गोष्पद-वारि यथाय ।
प्रेमार्पण, समदरशन, जगजन-दुःख जाय ॥८॥

नमो नमो प्रभु वाक्य-मनातीत
मनोवचनैकाधार ।
ज्योतिर ज्योति उजल हृदिकन्दर
तुमि तमभंजनहार ॥९॥

धे धे धे लंग रंग भंग, बाजे अंग संग मृदंग ।
गाइछे छन्द भकतवृन्द, आरति तोमार ॥१० ॥

# श्रीरामकृष्णांची आरती *

भवबंधनाचें खंडण करणाऱ्या, सकल जगताने वंदन केलेल्या, (हे भगवान् श्रीरामकृष्णा!) मी तुला वंदन करतों. तूं खरोखरी निरंजन आहेस, पण नररूप धारण केलें आहेस. तूं निर्गुणहि आहेस, आणि गुणमयहि (सगुणहि) आहेस. ॥ १ ॥

पापदोषापासून तूं मुक्त करणारा आहेस, जगताला भूषण आहेस, (आणि) तुझी काया चिन्मय आहे. ज्ञानांजनाने विमल झालेल्या तुझ्या नयनांनी कोणाकडे तूं पाहिलेंस तरी त्याचा मोह नष्ट होतो. ॥ २ ॥

तूं देदीप्यमान् आहेस, दिव्य भावांचा सागर आहेस, आत्मानंदांत सदा उन्मत्त (निमग्न) असतोस, आणि प्रेमाचा तर समुद्रच आहेस. भवसागर तारून परतीराला नेणारें, आणि भक्तांनाच प्राप्य असलेलें असें तुझें चरण-युगुल आहे. ॥ ३ ॥

तूं ह्या युगाचा प्रकट झालेला ईश्वर आहेस! इतकेंच नव्हे, तर जगदीश्वर आहेस! तूं योगांत साहाय्य करणारा आहेस (म्हणून) तुझ्या कृपेने आम्हांला चित्तवृत्ति-निरोध आणि समाहित (एकाग्र, साम्यावस्थेला पोहोचलेलें) मन (म्हणजे काय हें) पाहायला मिळालें! ॥ ४ ॥

---

* स्वामी विवेकानंदांनी रचलेल्या मागील पानावरील मूळ बंगाली आरतीचा अनुवाद. स्वामीजींनी प्रथम ह्या आरतीचें १ लें, ९ वें आणि १० वें अशीं तीनच कडवीं रचलीं होतीं. बाकीचीं कडवीं त्यांनी नंतर रचलीं.

दुःखाने आमची केलेली अवहेलना भंग करणाऱ्या! करुणाघना! कर्तव्यकठोरा! तूं आपले प्राण अर्पण करूनहि जगताचें तारण करणारा आहेस! आणि कलिकालाचा दोर कापून टाकणारा आहेस. ॥ ५ ॥

काम आणि कांचन (आणि) अतिनिंदित इंद्रियलोलुपता ह्यांपासून सोडविणारा आहेस. हे त्यागीश्वरा! हे नरवरा! तुझ्या चरणांच्या ठिकाणीं मला प्रेम दे. ॥ ६ ॥

हे निर्भया! गतसंशया! दृढनिश्चयमानसवन्ता! भक्तांची जात, कुल व श्रेष्ठकनिष्ठपणा न बघतां तूं त्यांना निर्हेतुकपणें आश्रय देत असतोस. ॥ ७ ॥

तुझे श्रीचरण हेंच माझें सर्वस्व आहे. त्या चरणांपुढे हा भवसागर गाईच्या खुराच्या खड्यांतल्या पाण्याप्रमाणे होऊन जातो. तूं प्रेमाचा अंकित आहेस, माझें प्रेम तुला अर्पण असो. हे समदृष्टिमन्ता! जगांतल्या जनांचें दुःख नाहीसें होवो. ॥ ८ ॥

वाणी आणि मन ह्यांच्या अतीत असलेल्या, पण वाणी आणि मन ह्यांना एकमात्र आधार असणाऱ्या हे प्रभो! तुला वारंवार नमस्कार असो. तूं ज्योतींची ज्योति आहेस, हृदयरूपी गुहा प्रकाशाने उज्ज्वलित करणारा आहेस, आणि तूं अज्ञानरूपी अंधकार नाहीसा करणारा आहेस. ॥ ९ ॥

"धे, धे, धे, लंग, रंग, भंग," असे बोल काढीत भक्तांच्या अंगविक्षेपांसह मृदंग झडतो आहे, आणि तुझे भक्तगण छंदोबद्ध गीतें गाऊन तुझी आरती करीत आहेत. ॥ १० ॥

❖ ❖ ❖

# विभाग तिसरा

## (मूळ संस्कृत)

# श्रीरामकृष्णस्तोत्राणि

## श्रीरामकृष्णांचीं स्तोत्रें

### (१)

ॐ ह्रीं ऋतं त्वमचलो, गुणजित् गुणेड्यो
नक्तन्दिवं सकरुणं तव पादपद्मम् ।
मोहंकषं बहुकृतं न भजे यतोऽहं
तस्मात्त्वमेव शरणं मम दीनबन्धो ।।१।।

ओं ! ह्रीं ! ऋता ! त्रिगुणजित् ! अचला ! स्तवीती--।
तूंतें गुणास्तवचि ! त्वत् पद मोहघाती--।।
ना, हे दयाळ ! उपकारि स्मरेचि मी तों ।
ह्यालागि तूंच मज आश्रय दीनबंधो ! ।।१।।

भक्तिर्भगश्च भजनं भवभेदकारि
गच्छन्त्यलं सुविपुलं गमनाय तत्त्वम्
वक्त्रोद्धृतन्तु हृदि मे न च भाति किञ्चित्
तस्मात्त्वमेव शरणं मम दीनबन्धो ।।२।।

"दैवी गुणें, भजनिं, भक्तिमुळे भवाचा--।
हो नाश; अंतिम फलास्तव हें पुरें गा !" ।।
बोले मुखें ! हृदिं न अर्थ मुळी उठे तो ।
ह्यालागि तूंच मज आश्रय दीनबंधो !।।२।।

तेजस्तरन्ति तरसा त्वयि तृप्ततृष्णा:
रागे कृते ऋतपथे त्वयि रामकृष्णे ।
मर्त्यामृतं तव पदं मरणोर्मिनाशं
तस्मात्त्वमेव शरणं मम दीनबन्धो ।।३।।



६

भक्तिमुळे, ऋतपथा ! तव रामकृष्णा ! ।
जातो रजोगुण त्वरें, शमतेहि तृष्णा ।।
मर्त्यां सुधा पद; जनी-मृति-नाश होतो ।
ह्यालागि तूंच मज आश्रय दीनबंधो ! ।।३।।

कृत्यं करोति कलुषं कुहकान्तकारि
ष्णान्तं शिवं सुविमलं तव नाम नाथ ।
यस्मादहं त्वशरणो जगदेकगम्य
तस्मात्त्वमेव शरणं मम दीनबन्धो ।।४।।

हे मोहनाशि ! सुकृतें करि दुष्कृतांतें— ।
तें 'ष्णा'न्त नाथ ! शुचि की शुभ नाम तूझें ।।
प्राप्तव्य तूच जगिं एक ! अनाथ मी तों ! ।
ह्यालागि तूंच मज आश्रय दीनबंधो ! ।।४।।

(२)

आचण्डालाप्रतिहतरयो यस्य प्रेमप्रवाहः
लोकातीतोऽप्यहह न जहौ लोककल्याणमार्गम् ।
त्रैलोक्येऽप्यप्रतिममहिमा जानकीप्राणबन्धः
भक्त्या ज्ञान वृतवरवपुः सीतया यो हि रामः ।।१।।

आचाण्डालाऽप्रतिहत असें प्रेम ज्याचें वहात ।
लोकतीता स्थिति तरि करी लोककल्याण नित्य ।।
त्रैलोक्यींही अजित-महिमा;'भक्ति'-सीतेसि 'राम'- ।
'ज्ञान' प्राणप्रिय पति; तया झाकि; तो हाचि राम ।१।।

स्तब्धीकृत्य प्रलयकलितं वाहवोत्थं महान्तं
हित्वा रात्रिं प्रकृतिसहजामन्धतामिस्रमिश्राम् ।
गीत शान्तं मधुरमपि यः सिंहनादं जगर्ज
सोऽयं जातः प्रथितपुरुषो रामकृष्णस्त्विदानीम् ।।२।।

युद्धीं केलें, प्रलयसदृशा, स्तब्ध, कोलाहलाला ।
अज्ञानाच्या उपजत तमोराशिचा नाश केला ॥
गीता शान्ता मधुरहि तशी सिंहसा गर्जला की ।
आता जन्मे पुरुषवर तो रामकृष्णस्वरूपीं ॥२॥

## (३)

**नरदेव देव जय जय नरदेव**
**शक्तिसमुद्रसमुत्थतरंगं**
**दर्शितप्रेमविजृम्भितरंगम् ।**
**संशयराक्षसनाशमहास्त्रं**
**यामि गुरुं शरणं भववैद्यम्**
**नरदेव देव जय जय नरदेव ॥१॥**

देवा ! नरदेवा ! जय जय नरदेवा ! ।
जय जय नरदेव ! जय जय नरदेवा ! ॥धृ०॥

शक्तिसमुद्रांतिल तूं तो भव्य तरंग ।
दाविसि किति तैसे तूं प्रेमाचे रंग ।
संशय-राक्षस-नाशन तूंचि महाशस्त्र ।
भववैद्यासि गुरूतें शरण अता जात ।
देवा ! नरदेवा ! जय जय नरदेवा ! ।
जय जय नरदेव ! जय जय नरदेवा ! ॥१॥

**अद्वयतत्त्वसमाहितचित्तं**
**प्रोज्ज्वलभक्तिपटावृतवृत्तम् ।**
**कर्मकलेवरमद्भुतचेष्टं**
**यामि गुरुं शरणं भववैद्यम्**
**नरदेव देव जय जय नरदेव ॥२॥**

अद्वय तत्त्वें ज्याचें सम झालें चित्त।
उज्ज्वल भक्तिपटें जो झाकी निज जीवितवृत्त ।
कर्ममया काया ज्या, अद्भुत कर्म करीत ।
भववैद्यासि गुरूतें शरण अता जात ।

देवा ! नरदेवा ! जय जय नरदेवा ! ।
जय जय नरदेव ! जय जय नरदेवा ! ॥२॥

## श्रीरामकृष्णप्रणामः

स्थापकाय च धर्मस्य सर्वधर्मस्वरूपिणे ।
अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय ते नमः ।।

## श्रीरामकृष्णांना प्रणाम

धर्मसंस्थापकाला त्या, सर्वधर्मस्वरूपि जो ।
अवतारवरिष्ठाला रामकृष्णा ! तुला नमीं ॥

❖ ❖ ❖

# श्रीशिवस्तोत्रम्

ॐ नमः शिवाय ।

निखिलभुवनजन्मस्थेमभंगप्ररोहाः
अकलितमहिमानः कल्पिता यत्र तस्मिन् ।
सुविमलगगनाभे त्वीशसंस्थेऽप्यनीशे
मम भवतु भवेऽस्मिन् भासुरो भावबन्धः ॥१॥

निखिलभुवनजन्म-स्थैर्य-नाशादि कोंब ।
अगणित-महिमा ज्यां, कल्पिले ज्यांत सर्व ॥
सुविमल गगनाभा; ईश आहे नसेही !
भव-चरणिं जडो त्या भक्ति जाज्वल्य माझी ॥१॥

निहतनिखिलमोहेऽधीशता यत्र रूढा
प्रकटितपरप्रेम्णा यो महादेवसंज्ञः ।
अशिथिल परिरम्भः प्रेमरूपस्य यस्य
हृदि प्रणयति विश्वं व्याजमात्रं विभुत्वम् ॥२॥

निरसि सकल मोहा ह्यामुळे ईश नित्य ।
प्रकट परम प्रेमें जो "महादेव" ख्यात ॥
प्रणयमय तयाच्या गाढ सान्निध्ययोगें ।
हृदयिं कळत की हें सर्व ऐश्वर्य खोटें ॥२॥

वहति विपुलवातः पूर्वसंस्काररूपः
प्रमथति बलवृन्दं घूर्णितेवोर्मिमाला ।
प्रचलित खलु युग्मं युष्मदस्मत्प्रतीतं
अतिविकलितरूपं नौमि चित्तं शिवस्थम् ॥३॥

प्रबल चलित वायू पूर्वसंस्काररूप ।
ढवळि सकल शक्ती वादळाचे-परीस ॥
प्रचलित करि युग्मा 'युष्मदस्मत्'-स्वरूपी ।
चपल मम मनाला त्या शिवस्था नमीं मी ॥३॥

जनकजनितभावो वृत्तयः संस्कृताश्च
अगणनबहुरूपा यत्र चैको यथार्थः ।
शमितविकृतिवाते यत्र नान्तर्बहिश्च
तमहह हरमीडे चित्तवृत्तेर्निरोधम् ।।४।।

"जनक", "जनित", जातें; वृत्ति संस्कारयुक्त ।
त्रिविध तरिहि होती सार्थ की एक येथ ॥
शमत विकृत वायू तैं न "बाहेर", "आंत" ! ।
स्तवित हर असा मी चित्तरोधस्वरूप ॥४॥

गलिततिमिरमालः शुभ्रतेजःप्रकाशः
धवलकमलशोभः ज्ञानपुञ्जाट्टहासः ।
यमिजनहृदिगम्यो निष्कलो ध्यायमानः
प्रणतमवतु मां सः मानसो राजहंसः ।।५।।

विगत-तिमिर-राशी * शुभ्रतेजः प्रकाश ।
धवल-कमल-शोभी, ज्ञान हें चंड हास्य ॥
कळत हृदयिं योग्यां, निष्कला ध्यात त्यास ।
प्रणत मजसि तारो तो मनो-राजहंस ॥५॥

दुरितदलनदक्षं दक्षजादत्तदोषं
कलितकलिकलंकं कम्रकल्हारकान्तम् ।
परहितकरणाय प्राणप्रच्छेदप्रीतं
नतनयननियुक्तं नीलकण्ठं नमामः ।।६।।

दुरित-दलन-दक्षा ! दक्षजा-वल्लभा रे ! ।
दलित-कलि-कलंका ! पुंडरीक प्रभो रे ! ॥
परहित करण्यातें प्राणदानाहि सिद्ध ।
नत-जन-कनवाळू ‡ नीलकंठा नमीत ॥६॥

❖ ❖ ❖

* पाठभेद--निहत-तिमिर-राशी

‡ मुळाला धरून पाठभेदः--नत जन-हित-दक्षा

# अंबास्तोत्रम्

का त्वं शुभे शिवकरे सुखदुःखहस्ते
आघूर्णितं भवजलं प्रबलोर्मिभंगैः ।
शान्ति विधातुमिह किं बहुधा विभग्नां
मातः प्रयत्नपरमासि सदैव विश्वे ॥१॥

तूं कोण आहेस ? हे मंगलमयि ! कल्याणकारिणि ! सुखदुःखहस्ते ! तुझ्या ह्या सुखदुःखरूप हातांनी प्रचंड लाटा उसळायला लावून ह्या भव-जलधीचें पाणी तूं घुसळून काढलें आहेस. नाना प्रकारें भंग पावलेली शांति ह्या विश्वांत पुनः प्रस्थापित करण्याकरताच, हे माते ! तूं हा सतत निकराचा प्रयत्न करीत आहेस काय ? ॥१॥

सम्पादयन्त्यविरतं त्वविरामवृत्ता
या वै स्थिता कृतफलं त्वकृतस्य नेत्री ।
सा मे भवत्वनुदिनं वरदा भवानी
जानाम्यहं ध्रुवमियं धृतकर्मपाशा ॥२॥

स्वतः विश्व-कर्म अविश्रान्तपणें करीत असून जी जीवांना आपल्या केलेल्या कर्मांचें फल निरंतर देत असते, आणि (ज्यांच्या कर्मांचा क्षय होऊन गेला आहे त्यांना) जी मोक्षपदाकडे घेऊन जात असते त्या भवानीचा वरदहस्त माझ्यावर रात्रंदिवस असो ! कारण सर्व कर्मपाश आपल्या हातांत धारण करणारी हीच आहे, हें मला निश्चितपणें माहीत आहे. ॥२॥

किं वा कृतं किमकृतं क्व कपाललेखः
किं कर्म वा फलमिहास्ति हि यां विना भोः ।
इच्छागुणैर्नियमिता नियमाः स्वतन्त्रै-
र्यस्याः सदा भवतु सा शरणं ममाद्या ॥३॥

अहो ! हिला वगळून केलेलें, न केलेलें, किंवा कपाळीं लिहिलेलें असें कोणतें कर्म किंवा कर्माचें फल तरी जगांत आहे ? जिच्या स्वतंत्र इच्छेच्या रज्जूंनी विश्वाचे सारे नियम नियंत्रित होतात त्या आदिकारण-स्वरूपिणीचाच मला सदा आश्रय मिळो. ॥३॥

सन्तानयन्ति जलधिं जनिमृत्युजालं
सम्भावयन्त्यविकृतं विकृत विभग्नम् ।
यस्या विभूतय इहामितशक्तिपालाः
नाश्रित्य तां वद कुतः शरणं व्रजामः ॥४॥

जिच्या अपरिमित सामर्थ्यशाली विभूतींनी ( शक्तींनी ) सृष्टींत जन्ममृत्युरूप जाळयाचा समुद्रच्या समुद्र पसरला जातो आणि अविकारी वस्तु ( ब्रह्म ) विकृत आणि विभिन्न केली जाते, तिचा आश्रय न करतां, सांगा, आम्हीं कोणाला शरण जावें ? ॥४॥

मित्रे रिपौ त्वविषमं तव पद्मनेत्र
स्वस्थेऽसुखे त्ववितथस्तव हस्तपातः ।
छाया मृतेस्तव दया त्वमृतञ्च मातः
मुञ्चन्तु मां न परमे शुभदृष्टयस्ते ॥५॥

शत्रु आणि मित्र ह्या दोघांच्याहिकडे तुझे पद्मनेत्र समत्वाने पाहतात. सुखी आणि दुःखी ह्या दोघांनाहि होणारा तुझा हस्तस्पर्श सारखाच अमोघ आहे. मृत्यूची छाया आणि अमृतत्व हीं दोन्ही, हे माते ! तुझीच दया आहे. हे परमदेवते ! तुझे शुभ दृष्टिपात मला कधीहि पारखे न होवोत. ॥५॥

क्वाम्बा शिवा क्व गृणनं मम हीनबुद्धेः
दोर्भ्यां विधर्तुमिव यामि जगद्विधात्रीम् ।
चिन्त्यं श्रिया सुचरणं त्वभयप्रतिष्ठं
सेवापरैरभिनुतं शरणं प्रपद्ये ॥६॥

ती कल्याणकर्त्री अम्बा कोठे ! आणि मीं हीनबुद्धीने केलेलें हें स्तवन कोठे ! जगन्निर्मात्रीला मी जणु माझ्या दोन दुबळ्या हातांनी धरूं पाहत आहें ! स्वतः लक्ष्मी सुद्धा ज्यांचें चिंतन करते, अभय (मुक्ति) ज्यांत नित्य प्रतिष्ठित आहे आणि सेवापरायण भक्तजनांकडून जे वंदिले जातात त्या तुझ्या सुंदर चरणांना मी शरण आलों आहे ॥६॥

**या मां चिराय विनयत्यतिदुःखमार्गै-**
**रासिद्धितः स्वकलितैर्ललितैर्विलासैः ।**
**या मे मतिं सुविदधे सततं धरण्यां**
**साम्बा शिवा मम गतिः सफलेऽफले वा ॥७॥**

आपल्या मनोरम लीलांद्वारें जी मला पूर्ण सिद्धीपर्यंत अति दुःखद मार्गांनी चिरकाल नेत आहे, इहलोकीं जी मला सतत सद्बुद्धि देत आली आहे, ती कल्याणकर्त्री अंबा हीच माझ्या प्रयत्नांच्या सफलतेंत किंवा विफलतेंत, कोणत्याहि स्थितींत, माझी अंतिम गति आहे. ॥७॥

❖ ❖ ❖

दा. क्र. 93863

# विभाग चवथा

## (मूळ हिंदी)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५२०७ वि: कादंबरी
क्रमांक १९८६ नोंद दि: २७।३।७९

# श्रीकृष्ण-संगीत

(चाल–भूपाळी)

हे वनमाली ! मजसि घराला जाऊं दे रे प्रिया ! ।
घराला जाऊं दे रे प्रिया ! ।
जाऊं दे रे प्रिया ! आज मज जाऊं दे रे प्रिया ! ॥१॥

माझ्या रे वनमालि ! तुझी मी दासी; सोडी गड्या !— ।
सख्या रे ! सोडी सोडी गड्या !— ।
चाल अशी ही ! आज जाउं दे घरासि, माझ्या प्रिया ! ॥२॥*

यमुना-तीरीं भरलि घागरी; हात जोडते तुला ।
प्रिया रे ! हात जोडते तुला ।
आज प्रिया रे, जाउं देइ रे ! जाऊं दे रे मला ॥३॥

'श्रीकृष्ण-संगीत' ह्या हिंदी कवितेचा अनुवाद

* पाठभेद:––चाल वाकडी असलि ! जाउं दे घरासि,
माझ्या प्रिया ! ॥२॥

# आमचें अन्य प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| १–२. | श्रीरामकृष्ण-चरित्र — प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | रु.न.पै. |
| | पृ. सं. ३५४+३० | ४.२५ |
| | द्वितीय भाग (तिसरी आवृत्ति) पृ. सं. ३४२+१२ | ४.३७ |
| ३. | श्रीरामकृष्ण-वचनामृत — (अंतरंग शिष्यांशीं व भक्तांशीं झालेलीं भगवान श्रीरामकृष्णांचीं संभाषणें) | |
| | प्रथम भाग (द्वितीय आवृत्ति) पृ. सं. ५८१ | ५.५० |
| ४. | स्वामी विवेकानंद यांचें चरित्र—श्री. सत्येंद्रनाथ मुजुमदारकृत | |
| | (सुधारलेली दुसरी आवृत्ति) पृ. सं. ४६० | ७.२५ |
| ५. | स्वामी विवेकानंदांची पत्रें — पृ. सं. ३३५ | ४.७५ |
| ६. | स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत — संकलक — | |
| | श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती — पृ. सं. ३९६ | ४.५० |
| ७. | ज्ञानयोग — स्वामी विवेकानंद | ४.०० |
| ८. | राजयोग — स्वामी विवेकानंद | ३.०० |
| ९. | दैवी वाणी — स्वामी विवेकानंद | २.७५ |
| १०. | भारतीय नारी — स्वामी विवेकानंद | २ ०० |
| ११. | वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव — स्वामी विवेकानंद | १.७५ |
| १२. | महापुरुषांच्या जीवन कथा — (सातवी आवृत्ति) — | |
| | स्वामी विवेकानंद | १.६२ |
| १३. | कर्मयोग — (दुसरी आवृत्ति) — स्वामी विवेकानंद | १ ६२ |
| १४. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १ ६० |
| १५. | भक्तियोग — (दुसरी आवृत्ति) — स्वामी विवेकानंद | १.७५ |
| १६. | वेदान्त आणि जीवन — स्वामी विवेकानंद | १.२५ |
| १७. | पूर्व आणि पश्चिम — स्वामी विवेकानंद | १.२५ |
| १८. | कोलंबो ते अल्मोरा — स्वामी विवेकानंद | ६.२५ |
| १९. | सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना — स्वामी विवेकानंद | १ ०० |

२०. बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें --
स्वामी विवेकानंद २.२५
२१. माझ्या मोहिमेची योजना -- स्वामी विवेकानंद ०.५०
२२. स्वामी विवेकानंद म्हणतात -- स्वामी विवेकानंद ०.५०
२३. विवेकानंद-वाणी -- (चवथी आवृत्ति) ० ९०
२४. माझें जीवन आणि कार्य -- स्वामी विवेकानंद ० ६५
२५. माझे गुरुदेव -- (चवथी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद १.००
२६. शिकागो व्याख्यानें -- (चवथी आवृत्ति) --
स्वामी विवेकानंद ०.९०
२७. पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व -- स्वामी विवेकानंद ०.६०
२८. हिंदुधर्माचें नव-जागरण -- (दुसरी आवृत्ति) --
स्वामी विवेकानंद ०.५६
२९. शिक्षण -- (दुसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद ०.५६
३०. पवहारी बाबा -- (दुसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद ०.५०
३१. हिमालयाच्या कुशींत -- स्वामी अखंडानंद २.५०
३२. रामकृष्ण-संघ -- ध्येय व इतिहास -- स्वामी तेजसानंद ०.७५
३३. स्वामी विवेकानंदांच्या आठवणी -- (दुसरी आवृत्ति) १.७५
३४. श्रीरामकृष्ण-वाक्सुधा -- (पांचवी आवृत्ति) --
(भगवान श्रीरामकृष्णांच्या निवडक उपदेशांचें त्यांच्याच
एका अंतरंग शिष्याने केलेलें संकलन) १.००
३५. साधु नागमहाशय-चरित्र -- (भगवान श्रीरामकृष्णांचे
सुप्रसिद्ध शिष्य) -- (दुसरी आवृत्ति)--
-- अनु. श्री. बा. सोमण २.००

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर - १.

REFBK-0013483

REFBK-0013483

## स्वामी विवेकानंद यांचें चरित्र

**सुधारलेली दुसरी आवृत्ति**

**डबल डेमी आकार : मोठा टाईप**

**आर्टपेपरचें सुंदर जॅकेट : सहा सुंदर चित्रें**

**पृष्ठें ४६०; मूल्य ७-२५**

---

## दैवी वाणी

**स्वामी विवेकानंद**

(अमेरिकेंतील 'सहस्रद्वीपोद्यान' [Thousand Island Park] नामक शांत व निवान्त स्थानीं निवडक शिष्यांना दिलेला स्फूर्तिदायी आध्यात्मिक उपदेश)

**सचित्र : आकर्षक जॅकेट : पृष्ठें २२५**

**किमत २ रु. ७५ न. पै.**

---

## स्वामी विवेकानंदांचीं पत्रें

(धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति, शिक्षण, प्रवासवर्णन, समाजसुधारणा, राष्ट्रोन्नति इत्यादि विषयांवरील महत्त्वाचीं पत्रें)

**सचित्र : सुंदर रंगीत जॅकेट**

**पृष्ठें ३३५; मूल्य ४.७५**

---

**आमच्या मराठी व हिंदी प्रकाशनांच्या विस्तृत सूचीपत्राकरिता लिहा.**

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर-१.**

तन्नो हंसः प्रचोदयात्